गुरुवार, २३ डिसेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १५६
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## ...तर राज्यातील शाळा पुन्हा बंद –शिक्षणमंत्री



**मुंबई** : काही दिवसांपूर्वी विद्यार्थ्यांसाठी शाळा सुरू केल्यानंतर महाराष्ट्र सरकार पुन्हा शाळा बंद करण्याबाबत निर्णय घेण्याची शक्यता आहे. ओमायक्रॉनची भीती वाढत असताना राज्याच्या शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी सरकार पुन्हा शाळा बंद करण्याचा विचार करू शकते, असे म्हटले आहे. देशात सध्या ओमायक्रॉनची सर्वाधिक प्रकरणे महाराष्ट्रात आहेत. गेल्या दोन वर्षांपासून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशातील राज्यातील शाळा महाविद्यालयांना टाळे लागले होते. त्यानंतर राज्यासह देशभरात अनेक ठिकाणी शाळा सुरू करण्यात आल्या आहेत, मात्र आता पुन्हा शाळा बंद होण्याची शक्यता आहे. पत्रकारांशी बोलताना गायकवाड यांनी, कोरोनाची प्रकरणे वाढत राहिल्यास सरकार पुन्हा शाळा बंद करण्याचा निर्णय घेऊ शकते. आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत, असे सांगितले.

अंतरंग
रायगडात कोरोना प्रतिबंधक लसीकरणाला उत्तम प्रतिसाद/२
कर्जत तालुक्यातील वंजारवाडी पूल बनला धोकादायक/५
राज्य कबड्डी स्पर्धेमध्ये रायगडचा संघ बाद फेरीत/६

# पहिलाच दिवस वादळी; मुख्यमंत्री गैरहजर

**मुंबई : प्रतिनिधी**

हिवाळी अधिवेशनाच्या बुधवारी (दि. २२) पहिल्याच दिवशी अपेक्षेप्रमाणे विरोधकांनी वेगवेगळ्या मुद्द्यांवरून राज्य सरकारला घेरले. या वेळी विधानसभा अध्यक्ष निवडणुकीवरून विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले. दरम्यान, सरकारी चहापानाला अनुपस्थित असणारे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीही गैरहजर राहिले.

विधानसभा अध्यक्षांची निवड आवाजी मतदानाने होणार असून माजी मुख्यमंत्री आणि आमदार पृथ्वीराज चव्हाण यांनी विधानसभा अध्यक्ष निवडणूक संदर्भातील नियम समितीचा अंतरिम अहवाल सभागृहात मांडला. यावर विरोधी पक्षाने आक्षेप घेतला.




ज्या सरकारकडे १७०चे बहुमत सांगितले जाते त्या सरकारच्या मनात अध्यक्ष निवडणुकीसाठी स्वतःच्या बहुमतावर विश्वास का नाही, अशी विचारणा या वेळी फडणवीसांनी केली. नियम बदलले तर किमान त्याचा सभागृहासमोरील विचाराचा कालावधी कमी करता येणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

स्वतःच्या आमदारांवरच अविश्वास असणारे इतके असुरक्षित सरकार आम्ही महाराष्ट्राच्या इतिहासात कधी पाहिले नाही. महाराष्ट्र विधानसभेच्या स्थापनेपासून जी प्रथा होती ती बदलण्याचा अट्टाहास का, असा सवाल करून तुम्ही हे रेटून नेणार असाल, तर आम्ही आमची लढाई कायदेशीर लढू, असा इशारा या वेळी फडणवीस यांनी दिला.

### सरकारने अपात्र कंपन्यांना टेंडर दिले

या वेळी विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील भरती प्रक्रियेतील घोटाळ्यावरही भाष्य केले. २१ जानेवारी २०२१ रोजी न्यासा नावाच्या कंपनीला अपात्र ठरवण्यात आले होते, पण ४ मार्च रोजी पुन्हा याच कंपनीला पात्र ठरवले. चार कंपन्यांना डावलून न्यासा कंपनीला संपूर्ण काम देण्यात आले. त्यांनाच काम देण्याची आवश्यकता काय होती? त्या माध्यमातून आधी आरोग्य विभागाच्या भरतीमध्ये घोटाळा झाला आणि मग म्हाडाच्या भरतीमध्ये घोटाळा झाला. जीए सॉफ्टवेअर कंपनीलादेखील अपात्र ठरवले होते. त्यानंतर त्यांनी शिक्षक पात्रता परीक्षेत (टीईटी) घोटाळा केला. या सरकारच्या काळात एकही परीक्षा घोटाळ्याशिवाय होत नाही, असा आरोप फडणवीसांनी केला.

### मविआ सरकार हाय हाय!





**मुंबई : राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला बुधवारी प्रारंभ झाला. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सभागृहात येण्यापूर्वी विरोधी पक्ष असलेल्या भाजपच्या सदस्यांनी विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविकास आघाडी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली तसेच राज्यातील विविध समस्या दर्शविणारे फलक हाती घेऊन सरकारच्या कुचकामी कारभाराचा जाहीर निषेध केला.**

### पंतप्रधानांची नक्कल केल्याबद्दल भास्कर जाधवांची बिनशर्त माफी

शिवसेना आमदार भास्कर जाधव यांनी विधानसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींची नक्कल केल्यामुळे अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी खडाजंगी पाहायला मिळाली. राज्यातील विजेच्या मुद्द्यावरील लक्षवेधी चर्चेदरम्यान ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी नागरिकांच्या खात्यात १५ लाख रुपये जमा करू, असे म्हणाले होते. त्याचे काय झाले, असा सवाल केला. त्यावर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीसांनी आक्षेप घेतला. पंतप्रधान असे कधीच बोलले नाही. मी तुम्हाला खुले आव्हान देतो तुम्ही याबाबतचा पुरावा द्या, अन्यथा माफी मागा, असे ते म्हणाले. या वेळी भास्कर जाधव यांनी पंतप्रधानांची नक्कल करून दाखवली. यावरून सभागृहात विरोधक आक्रमक झाले. जाधव यांनी माफी मागावी, अशी मागणी फडणवीसांनी केली. या वेळी गोंधळ झाल्याने सभागृह तहकूब करण्यात आले. त्यानंतर सभागृह सुरू होताच जाधवांनी बिनशर्त माफी मागितली.

## राज्य सरकार घाबरलेले, स्वत:च्या आमदारांवरही त्यांचा विश्वास नाही!

■ देवेंद्र फडणवीसांचा हल्लाबोल



**मुंबई** : राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनाचे पहिल्या दिवसाचे कामकाज संपल्यानंतर विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा अध्यक्ष निवडणुकीवरून महाविकास आघाडी सरकारवर निशाणा साधला. हे सरकार घाबरलेले आहे. या सरकारला स्वतःच्या आमदारांवरही विश्वास नाही, असा घणाघात त्यांनी केला. त्याचबरोबर सभागृहात कोणकोणत्या विषयांवरून सरकारला घेरले याची माहितीही फडणवीस यांनी या वेळी माध्यमांशी बोलताना दिली.

सरकारवर हल्लाबोल करताना फडणवीस म्हणाले की, अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी जो प्रस्ताव आज मांडण्यात आला त्यातून हे सरकार किती असुरक्षित आहे हे लक्षात आले. ६० वर्षांपर्यंत अध्यक्षांची निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने झाली. अगदी जेव्हा विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये फक्त ५-७ मतांचा फरक होता तेव्हाही ही निवडणूक गुप्त पद्धतीने झाली, पण १७० आमदार आमच्याकडे आहेत असे सांगणाऱ्या महाविकास आघाडीला आवाजी मतदानाने ही निवडणूक घेण्याची नामुष्की ओढावली, कारण त्यांच्यातील असंतोष इतका भयानक आहे की त्यांना खात्री आहे त्यांचे आमदार हा असंतोष अध्यक्षांच्या निवडणुकीत व्यक्त करतील आणि त्यांच्यावर नामुष्की ओढावेल. म्हणून त्यांनी नियम बदलाचा घाट घातला.

ज्या प्रकारे शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडले जात आहेत. डीपी काढून टाकले जात आहेत. पाणीपुरवठ्याचे कनेक्शन तोडले जात आहेत. त्या वेळी राज्य सरकार पैसे देत नाही, असे उत्तर ऊर्जामंत्री नितीन राऊतांनी दिले. **(पान २ वर..)**

### निवडक

**एसटी कर्मचाऱ्यांविरोधात अवमान नोटीस काढण्यास कोर्टाचा नकार**

**मुंबई** : राज्यात एसटी कर्मचाऱ्यांच्या संपावर बुधवारी (दि. २२) मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली, पण या वेळी कोणताही तोडगा निघाला नाही. दरम्यान, कोर्टाने महामंडळाला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले, तसेच पुढील सुनावणी ५ जानेवारी रोजी निश्चित केली आहे. या वेळी कोर्टाने कर्मचाऱ्यांविरोधात अवमानाची नोटीस काढण्यास नकार दिला.

**राज्याच्या माहिती व जनसंपर्क महासंचालकपदी दीपक कपूर**

**मुंबई** : सनदी अधिकारी दीपक कपूर यांनी बुधवारी (दि. २२) राज्याच्या माहिती व जनसंपर्क महासंचालक तथा सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ. दिलीप पांढरपट्टे यांच्याकडून स्वीकारला. कपूर हे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत आहेत.

## अटलजींच्या जयंती दिनी भाजपतर्फे सुशासन दिनानिमित्त विविध कार्यक्रम

■ आमदार प्रशांत ठाकूर यांची माहिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंती दिनी २५ डिसेंबर रोजी भारतीय जनता पक्षातर्फे सुशासन दिनानिमित्ताने राज्यात मोदी सरकारच्या सात वर्षांतील कामगिरीची माहिती देणारी व्याख्याने, ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान, ई-श्रम कार्ड वितरण असे विविध कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांच्या उपस्थितीत मुंबईत अटलजींच्या पुतळ्याचे अनावरण होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले आहे की, सुशासन दिनानिमित्ताने 'अटलजी ते मोदीजी-सुशासनाचा प्रयास' या विषयावर विविध क्षेत्रांतील नामवंतांची व्याख्याने होणार आहेत, तसेच वकील, डॉक्टर, चार्टर्ड अकाऊंटंट, प्राध्यापक, उद्योजक अशा मंडळींचे मेळावे आयोजित करून मोदी सरकारने घेतलेले जनहिताचे निर्णय, सुशासन संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी टाकलेली पावले याची माहिती दिली जाणार आहे. गेल्या सात वर्षांत मोदी सरकारने शेतकरी व अन्य समाजघटकांच्या कल्याणासाठी घेतलेल्या निर्णयांची माहिती देणारी पत्रके बूथस्तरापर्यंत वितरित केली जाणार आहेत. याखेरीज सर्व बूथवर अटलजींच्या प्रतिमेला अभिवादन, जनसंघापासून काम करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान, अटलजींच्या कवितांचे वाचन, महाविद्यालय परिसरात निबंध, चित्रकला स्पर्धा असे कार्यक्रम होतील. **(पान २ वर..)**



**पनवेल : पळस्पे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाजपचे राकेश कांबळे यांची सदस्यपदी बिनविरोध निवड झाली आहे. याबद्दल त्यांचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पळस्पे ग्रामपंचायतीचे उपसरपंच अजय तेजे, दुंदरे ग्रामपंचायतीचे सदस्य शांताराम चौधरी, भिंगारचे माजी उपसरपंच योगेश लहाने, शिवकर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अंबाजी ढवळे, प्रवीण मुंबईकर, परीक्षक भगत आदी उपस्थित होते.**

## पनवेल मनपा हद्दीतील रस्ते होणार स्वच्छ आणि खड्डेमुक्त

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीतील रस्त्यांवरील खड्डे भरण्यात येणार असून आता पथदिवेही (एलईडी) चमकणार आहेत. याशिवाय महापालिका हद्दीत स्वच्छता मार्शल नेमण्यास बुधवारी (दि. २२) झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. त्यामुळे नागरिकांना स्वच्छ व खड्डेमुक्त रस्त्यावरून चालण्याचे समाधान मिळणार आहे.



पनवेल महापालिकेच्या स्थायी समितीची बैठक आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात बुधवारी सभापती संतोष शेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला सभागृह नेते परेश ठाकूर, सदस्य जगदिश गायकवाड, प्रकाश बिनेदार, निलेश बावीस्कर व इतर सदस्य, तसेच उपायुक्त विठ्ठल डाके आणि अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत ६ डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत स्थगित ठेवण्यात आलेल्या रस्त्यावरील निरनिराळे क्षमतेचे पथदिवे (एलईडी) दोन वर्षे पुरवठा करण्याच्या निविदेला मंजुरी देण्यात आली. महापालिका हद्दीतील विविध ठिकाणचे रस्ते दुरुस्ती करण्याच्या खर्चासही मंजुरी दिली गेली. कंत्राटी कर्मचारी पुरवणाऱ्या मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला एक वर्ष मुदतवाढ देण्यात आली. याशिवाय पाणीपुरवठा विभागातील विद्युत पंपाची दुरुस्ती करण्यासही मंजुरी देण्यात आली.

महापालिकेकरिता कोविड-१९कामी भाडेतत्त्वावर वाहने पुरवणाऱ्या जे. के. टुरिस्ट आणि ट्रान्स्पोर्ट कंपनीच्या झालेल्या खर्चास या वेळी मंजुरी देण्यात आली. **(पान २ वर..)**

## खालापुरातील राष्ट्रवादी पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या खालापूर तालुक्यातील अनेक पदाधिकाऱ्यांनी बुधवारी (दि. २२) तडकाफडकी आपले राजीनामे तालुकाध्यक्ष गुरव यांच्याकडे दिले. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

राष्ट्रवादीचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य दीपक बोंदाडे, खालापूर तालुका सरचिटणीस वैभव भोईर, ओबीसी सेलचे मंगेश गव्हाणकर, युवकचे तालुका सरचिटणीस किशोर म्हात्रे, शहर अध्यक्ष रोशन खराळ आदी पदाधिकाऱ्यांनी आपले राजीनामे वैयक्तिक कारणास्तव देत असल्याचे सामुदायिक राजीनामा पत्रात नमूद केले आहे. दरम्यान, या राजीनाम्यामुळे खालापूर राष्ट्रवादीत आलबेल नसल्याचे समजते. नगरपंचायत निवडणुकीत वरिष्ठांनी पाठ फिरविल्याने हे सामुदायिक राजीनामे दिल्याचे समजते.



# रायगड जिल्ह्यात लसीकरणाला उत्तम प्रतिसाद

## ■ ९३.४१ टक्के नागरिकांनी घेतला पहिला डोस

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात ९३.४१ टक्के नागरिकांचा कोरोना प्रतिबंधात्मक लसीचा पहिला डोस पूर्ण झाला असून, ६२.४१ टक्के लाभार्थ्यांनी लसीचे दोनही डोस घेतले आहेत. जिल्ह्याचे १०० टक्के लसीकरण उद्दिष्ट साध्य करण्यासाठी रायगड जिल्हा परिषद प्रयत्न करत आहे.

रायगड जिल्ह्यात १८ वर्षांवरील २१ लाख ९२ हजार ५०० लाभार्थी आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत ३४ लाख १६ हजार ६९१ कोरोना प्रतिबंधात्मक लसीचे डोस लाभार्थ्यांना देण्यात आले असून, यामधील १३ लाख ६८ हजार ६०६ लाभार्थ्यांना लसीचे दोनही डोस म्हणजे २७ लाख ३७ हजार २१२ डोस देण्यात आले आहेत. तर सहा लाख ७९ हजार ४७८ लाभार्थ्यांनी लसीचा पहिला डोस घेतला आहे. तर एक लाख ४४ हजार ४१५ लाभार्थ्यांनी अद्यापपर्यंत कोरोना प्रतिबंधात्मक लसीचा एकही डोस घेतलेला नाही.

रायगड जिल्ह्यात कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम राबविण्यासाठी ५६९ लसीकरण केंद्र सुरू करण्यात आली आहेत. यामधील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, तसेच त्यांच्या अखत्यारीतील उपकेंद्रांमध्ये २४५ लसीकरण केंद्र सुरू आहेत. जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये यांच्या अखत्यारीत २८; तर पनवेल महानगर पालिकेच्या अखत्यारीत २८, तसेच खाजगी २६८ लसीकरण केंद्र सुरू आहेत.



कोरोना विषाणू प्रादूर्भाव नियंत्रणात आला आहे, मात्र अद्याप पूर्ण धोका टळलेला नाही. त्यामुळे नागरिकांनी कोरोना विषाणू प्रादूर्भाव रोखण्यासाठी मास्कचा वापर करावा, वेळोवेळी सॅनिटायझरने हात स्वच्छ करावेत, एकमेकांसोबत बोलताना सुरक्षित अंतर ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**रायगड जिल्ह्यात १०० टक्के कोरोना प्रतिबंधात्मक ग्रामीण भागातील लसीकरण पूर्ण होण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाच्या माध्यमातून व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. ज्या लाभार्थ्यांनी लसीचा पहिला डोस घेतलेला नाही, तसेच ज्यांनी पहिला डोस घेतला आहे, मात्र दुसऱ्या डोसमधील निर्धारित अंतर पूर्ण झाले असूनही दुसरा डोस घेतलेला नाही. त्यांची यादी तयार करण्यात येत आहे.**
**–डॉ. किरण पाटील,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद**

# विद्यापीठ कायद्यातील दुरुस्तीविरोधात अभाविप आक्रमक



**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारच्या मंत्रिमंडळाने विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर स्वतःचे नियंत्रण आणण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात बदल करीत मंत्रिमंडळ बैठकीत काही निर्णय घेतले. या निर्णयाविरोधात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने गेले दोन दिवस साखळी आंदोलन करीत आहे. मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट कॅम्पस येथे अभाविपने बुधवारी (दि. २२) शिक्षणातील वाढत्या राजकीय हस्तक्षेपाविरुद्ध निदर्शने केली. हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्य सरकारच्या या मनसुब्याविरोधात अभाविपने पोतराज बनत आसूड ओढला.

मंत्रिमंडळ निर्णयानुसार विद्यापीठ कायद्यात केलेले बदल म्हणजे विद्यापीठाच्या स्वायत्ततेवर घाला घालण्याचा डाव आहे. शिक्षण क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही, असे मत अभाविप कोकण प्रदेश मंत्री अमित ढोमसे यांनी व्यक्त केले. संबंधित निर्णय तत्काळ रद्द करण्यात यावा; अन्यथा रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा देण्यात आला.

# मोफत कायदेविषयक सल्ला व मदत केंद्राचे उद्घाटन



**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेलमध्ये पनवेल वकील संघटना आणि अधिवक्ता परिषद, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने 'न्याय केंद्र'– मोफत कायदेविषयक सल्ला व मदत केंद्राचे उद्घाटन सोमवारी (दि. २१) बार कौन्सिल महाराष्ट्र आणि गोवाचे चेअरमन ॲड. गजानन चव्हाण आणि व्हाईस चेअरमन ॲड. संग्राम देसाई यांच्या हस्ते करण्यात आले.

नवीन पनवेलमधील पोदी येथील भुजबळ वाडीत पनवेल वकील संघटना आणि अधिवक्ता परिषद, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने 'न्याय केंद्र' – मोफत कायदेविषयक सल्ला व मदत केंद्र सुरू करण्यात आले आहे. सोमवारी संध्याकाळी ५ वाजता या केंद्राचे उद्घाटन बार कौन्सिल महाराष्ट्र आणि गोवाचे चेअरमन ॲड. गजानन चव्हाण आणि व्हाईस चेअरमन ॲड. संग्राम देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी उपनगराध्यक्ष सुभाष भुजबळ, अजित लोंढे, क्रांती चितळे, हेमंत भुजबळ, राकेश भुजबळ, ॲड. प्रशांत भुजबळ, ॲड. धनाजी तोकडे उपस्थित होते.

# हवालदार महेश पोतदार यांनी हरवलेले पाकीट दिले परत

**पनवेल : बातमीदार**

कर्तव्य बजावित असलेले वाहतूक शाखेचे हवालदार महेश पोतदार यांना रस्त्यात मिळालेले पैशाने भरलेले पाकीट व इतर कागदपत्र सदर संबंधित व्यक्तीशी संपर्क साधून त्यांना प्रामाणिकपणे परत केल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



अनिल फडके हे बेलापूर ते नेरे पनवेल बाईकवरून घरी परत येत असताना कळंबोली सर्कल येथे त्यांचे पाकीट खिशातून पडले आणि ते वाहतूक पोलीस खात्यात कार्यरत असलेले हवालदार महेश पोतदार यांना सापडले. त्यात साडेआठ हजारांची रोकड, एटीएम कार्ड, आधार कार्ड व इतर कागदपत्रे होती. त्यात असणाऱ्या कागदपत्रांवरून अनिल फडके यांचा शोध लावला व त्यांच्याशी संपर्क साधून तुमचे पडलेले पॉकीट मला मिळालेले आहे ते ओळख पटवून घेवून जा, असे सांगितले. त्याप्रमाणे सोपस्कार पूर्ण करून मूळ मालक अनिल फडके यांना ते पाकीट प्रामाणिकपणे परत केले. पाकीट परत मिळाल्याने अनिल फडके यांना आनंद खूप मोठा झाला होता. त्याबद्दल त्यांनी महेश पोतदार यांचे आभार मानले.

# कोपर येथे स्वयंम सहायता समूहांची बैठक उत्साहात

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

स्वयंम सहायता समूहांची बैठक बुधवारी (दि. २२) कोपर येथे झाली. यामध्ये गव्हाण, कोपर, शिवाजीनगर येथील २५ स्वयंम सहायता समूह सहभागी झाले होते. या वेळी बचत गटांकडून फिरता निधी १५ हजार रुपये मिळविण्यासाठी फॉर्म भरून घेतले आणि महिला स्वयंरोजगार करण्यासाठी महिलांना तयार करण्यात आले.



या बैठकीत पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांना शासकीय योजना तसेच उपजीविकेबद्दल उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले. या वेळी प्रभाग समन्वयक समीक्षा गोसावी, सीआरपी मनीषा घरत आदी उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे विविध स्वयंम सहायता समूहाच्या सीमा देशमुख, विनिता देशमुख, सुरेखा कोळी, संगीता कोळी, गीता ठाकूर, सुप्रिया म्हात्रे, नयना ठाकूर, पुष्पलता, रत्नप्रभा घरत, दीपिका घरत, मनीषा ठाकूर, श्रद्धा ठाकूर आदी महिला हजर होत्या.

# वर्तमानपत्राचा कागद खाद्यपदार्थ ठेवण्यास वापरू नका

## अन्न व औषध प्रशासन विभागाचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

वर्तमानपत्राचा वापर खाद्यपदार्थ पॅकिंगसाठी करण्यात येऊ नये. अशा इशारा अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त शि. स. देसाई यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे. अन्नसुरक्षा व मानदे कायदा २००६ हा महाराष्ट्रासह संपूर्ण देशात ५ ऑगस्ट २०११पासून लागू करण्यात आला. या कायद्याचा प्रमुख उद्देश जनतेला सुरक्षित, सकस व निर्भेळ अन्न उपलब्ध करून देणे हा आहे.

अनेकदा लोक बाहेरून नाष्टा मागवितात. त्या वेळी अन्न व्यावसायिक वडापाव, पोहे यासारखे अन्नपदार्थ वर्तमानपत्रात बांधून देतात. त्यामुळे आरोग्याला धोका निर्माण होतो. वृत्तपत्राची शाई केमिकलपासून बनविलेली असते. त्यामुळे वृत्तपत्रात गरम खाद्यपदार्थ पॅकिंग करणे व ग्राहकांना देणे धोकादायक आहे.

# कामोठे येथे बिल भरले असतानाही वीज कापली

## विद्युत कर्मचाऱ्यांचा ढिसाळ कारभार

**पनवेल : बातमीदार**

कामोठे येथील विद्युत वितरणचे विद्युत कर्मचारी आपल्या कामाच्या बाबतीत भलतेच तत्पर झालेले दिसतात व जनतेची वीज कापण्यात त्यांना भलतात आनंद वाटतो असे दिसते. त्यासाठी ते बिल भरले की नाही याची तपासणी न करता विद्युत पुरवठा खंडित करीत आहेत.

असा अनुभव पनवेल महानगरातील ४के चॅनलचे संपादक गौरव जहागीरदार आणि त्यांच्या कुटुंबाला आला. गौरव जहागीरदार यांनी ऑफिसला जाताना १२.३० वा. लाईट बिल भरले, तरी संध्याकाळी ४ वाजता त्यांना त्यांच्या घरून फोन आला लाईट कापली म्हणून. नियमानुसार लाईट कापण्याअगोदर घरी विचारपूस करणे गरजेचे असताना कारण घरी महिला आणि लहान मुले असतात जर बिल भरले असले तर पावती दाखवली जाते पण कामोठे मधील कर्मचार्यांना लाईट कापण्या अगोदर बिल भरले की नाही हे विचारपूस करणे पण गरजेचे वाटले नाही. सरळ लाईट कापली याला विद्युत कर्मचार्यांचा हलगर्जीपणा म्हणावे की आपल्या कामाची तत्परता या त्यांच्या कार्यतत्परते बद्दल वरिष्ठ अधिकारी काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
गुरुवार, दि. २३ डिसेंबर २०२१ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

■ १. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा–उरण नाका, पनवेल
■ २. यूपीएचसी–३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
■ ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, से. ५ ई, कळंबोली
■ ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
■ ५. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
■ ६. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर

सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.

■ ७. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
■ ८. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
■ ९. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
■ १०. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
■ ११. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
■ १२. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

■ १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
■ २. काळण समाज हॉल, पनवेल ■ ३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

पनवेल ग्रामीण लसीकरण

■ सिद्धी करवले, रा.जि.प. शाळा
■ धानसर रा.जि.प. शाळा
■ बेलपाडा मंदिर
■ पेठ, रा.जि.प. शाळा
■ ओवे, रा.जि.प. शाळा
■ पाले खुर्द पाटीलवाडी, रा.जि.प. शाळा
■ तोंडरे, खालचा पाडा, रा.जि.प. शाळा
■ घोट रा.जि.प. शाळा (म्हात्रे पाडा/गोंधळी पाडा/मढवी पाडा/वाघ्राची वाडी
■ ढोंगऱ्याचा पाडा, रा.जि.प. शाळा
■ कामोठे, रा.जि.प. शाळा


## पान १ वरून

### राज्य सरकार घाबरलेले, स्वत:च्या आमदारांवरही त्यांचा विश्वास नाही!

त्यामुळे राज्य सरकारने यावर उत्तर द्यावे, अशी मागणी आम्ही केली. तेव्हा ही लक्षवेधी राखून ठेवण्यात आली. उद्याही आम्ही यावर आवाज उठवू. सरकार सांगते की, थकबाकी वाढली. ते व्याजावर व्याज लावून सांगितले जाते. हे राज्य सरकार एक नवा पैसा देत नाही, मात्र सावकारासारखी वसुली सुरू आहे. याचा विरोध आम्ही करीत राहू, असा इशारा फडणवीस यांनी दिला.

शेतकऱ्यांच्या नुकसानीचा मुद्दा आम्ही लावून धरला. यावर सरकार पूर्णपणे उघडे पडले. साडेअकरा हजार कोटीचे पॅकेज किती फसवे आहे हे त्यांनीच मान्य केले. २५ आणि ५० हजारांची घोषणा करणाऱ्या उद्धव ठाकरेंच्या काळात किती मदत झाली त्याची यादीच मी वाचून दाखवली. राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला अशी स्थिती असल्याचा टोला फडणवीसांनी लगावला. केंद्र सरकारकडून आलेले पैसेही हे सरकार वाटू शकलेले नाही हे आज आम्ही दाखवून दिले आहे. शेतकऱ्यांचे पंचनामे न देता त्यांना टाळल्यामुळे मोठा रोष आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अनुपस्थितीवरून टीका करण्यात येतेय. त्याबाबत विचारले असता, माननीय मुख्यमंत्र्यांची तब्येत खराब असेल आणि ते येत नाहीत म्हणून आक्षेप घेणे बरोबर नाही. तब्येत खराब असेल, त्यामुळे ते आले नाहीत. तरीही आम्ही अधिवेशन पार पाडू. आमचे म्हणणे एवढेच आहे की, काम व्हावे आणि जबाबदाऱ्यांचे वाटप त्यांनी करावे, असा सल्ला फडणवीस यांनी मुख्यमंत्र्यांना दिला.

### अटलजींच्या जयंती दिनी भाजपतर्फे सुशासन दिनानिमित्त विविध कार्यक्रम

महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये सुशासनाची कल्पना राबविण्यासाठी उपक्रम राबविणाऱ्या भाजप लोकप्रतिनिधींचा अटल पुरस्कार देऊन गौरव केला जाणार आहे. असंघटीत कामगारांसाठी मोदी सरकारने सुरू केलेल्या ई–श्रम कार्ड योजनेची माहिती देऊन संबंधितांना या कार्डचे वितरण करणे आदी कार्यक्रमही होणार आहेत, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

### पनवेल मनपा हद्दीतील रस्ते होणार स्वच्छ आणि खड्डेमुक्त

या वेळी प्रकाश बिनेदार यांनी या कंपनीने स्थानिकांकडून महापालिकेला पुरवण्यासाठी घेतलेल्या वाहनांचे भाडे महापालिकेकडून पैसे घेऊनही ठेकेदाराने दिले नसल्याचा आरोप केला. त्यामुळे ठेकेदाराला वाहनमालकांकडून पैसे मिळाल्याबाबत एनओसी आणल्याशिवाय कोणताही दाखला देण्यात येऊ नये व ठेकेदाराला पैसे दिले असल्याने ठराव मंजुरीसाठी असा शब्द न वापरता अवलोकनार्थ असा शब्द वापरण्याची सूचना सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केली. महापालिका हद्दीत स्वच्छता मार्शल तैनात करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे नवीन वर्षात कचरा करणाऱ्यांना दंड भरावा लागणार आहे.

# निलंबन कालावधी कमी करण्याची विधानसभा उपाध्यक्षांना विनंती

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्या मतदारांनी आम्हाला त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी विधानसभेत निवडून दिले त्या मतदारांचे प्रश्न आम्हाला निलंबित असल्याने हिवाळी अधिवेशनात मांडता येणार नाहीत. त्यामुळे मतदारांवर अन्याय होऊ नये म्हणून आमच्यावर करण्यात आलेल्या निलंबनाच्या कारवाईच्या एक वर्षाच्या कालावधीचा फेरविचार करण्यात यावा, अशी विनंती करणारी १२ पत्रे भाजपच्या १२ आमदारांनी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांना पाठवली आहेत.

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात भाजपच्या १२ आमदारांना एक वर्षासाठी निलंबित करण्यात आले होते. या निलंबनाविरोधात १२ आमदारांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे. ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने दाखल करून घेतली असून ११ जानेवारीला पुढील सुनावणी होणार आहे. त्या वेळी न्यायालयाने सरकार आणि विधिमंडळाला आपली बाजू मांडण्यास सांगितले आहे.

दरम्यान, ही याचिका दाखल करून घेताना न्यायालयाने या आमदारांचा आपल्या निलंबनाचा कालावधी कमी करण्यासाठी विधानसभा अध्यक्षांना विनंती करण्याचा अधिकार अबादीत ठेवला आहे. त्यानुसार या १२ आमदारांनी स्वतंत्रपणे पत्र लिहून विधानसभा उपाध्यक्षांना विनंती केली आहे.

## दुखवटा

### माजी न्यायमूर्ती शिवाजीराव चिंचोलीकर



**मुंबई :** माजी न्यायमूर्ती शिवाजीराव बापूसाहेब चिंचोलीकर यांचे बुधवारी (दि. २२) पहाटे दीड वाजता हृदयविकाराच्या झटक्याने मुंबईत निधन झाले. त्यांचे वय ८५ वर्षे होते. बीड जिल्ह्यातील केज हे त्यांचे मूळ गाव. मुंबईचे मुख्य न्यायदंडाधिकारी म्हणून ते निवृत्त झाले होते. त्यांच्यावर दादर येथील शिवाजी पार्कजवळील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सिडकोच्या नवीन घरांची निघणार सोडत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सध्या सुरू असलेल्या सिडकोच्या २४ हजार बांधकामांपैकी सात हजार लाभार्थींनी घरांची सर्व रक्कम भरल्याने वर्षअखेरपर्यंत त्यांच्या घरांची नोंदणी, करारनामे आणि ताबा अशी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर सिडको पाच हजार नवीन घरांची सोडत काढणार आहे. ही सोडत १५ ते २६ जानेवारीदरम्यान काढली जाईल असे समजते.

महागृहनिर्मितीत सिडकोचे कोट्यवधी रुपये अडकल्याने लवकरात लवकर तयार घरे, तसेच यापूर्वी शिल्लक राहिलेली ९०० घरांची विक्री पुढील वर्षांच्या प्रारंभी सुरू केली जाणार आहे. यामुळे सिडकोच्या तिजोरीत भर पडणार आहे.

सिडको पाच नोडमध्ये २४ हजार घरांचे बांधकाम करीत आहे. त्यामुळे निधी उभारण्याचे अनेक मार्ग सिडको सध्या अंगीकारत असून यात बांधून तयार होत असलेली किंवा एक दोन वर्षांत उभ्या राहणाऱ्या इमारतीतील घरांची विक्री करण्याचा कार्यक्रम सिडकोच्या पणन विभागाने तयार केला आहे. अडीच वर्षांपूर्वी टप्प्याटप्प्याने काढण्यात आलेल्या




सहा सोडतींत सिडकोने २४ हजार घरांचे वाटप केलेले आहे, मात्र यात सात हजारांपेक्षा जास्त लाभार्थी अपात्र ठरलेले आहेत. अपात्र ठरलेल्या लाभार्थींच्या जागी प्रतीक्षा यादीवरील लाभार्थींना घरांचे वाटप केले जात असून यातील अनेक लाभार्थींनी घराची सर्व रक्कम भरून घरांचे ताबे घेण्यास सुरुवात केली आहे. बँकेचे हप्ते आणि भाडे या दृष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी लाभार्थींनी घर लवकर मिळावे यासाठी सिडकोकडे विनंती केलेली आहे. त्यांना लवकरात लवकर घरांचा ताबा देण्याची प्रक्रिया राबवली जात असून पणन विभागाने सकारात्मक दृष्टिकोन दाखविला आहे. सात हजार २२६ घरांचा ताबा देण्याची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर सिडको पाच हजार घरांची सोडत काढणार आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी ही सोडत राहणार असून १५ जानेवारीपर्यंत ही सोडत काढण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. सिडकोने यापूर्वी १५ ऑगस्ट, २ ऑक्टोबर, दिवाळी अशा महत्त्वाच्या दिवशी सोडती काढलेल्या आहेत. त्यामुळे ही सोडतदेखील २६ जानेवारी रोजी काढली जाईल अशी शक्यता वर्तवली जात आहे. छाननी प्रक्रियेत सात हजार अर्ज बाद झाले असून नागरिक सहज म्हणून ऑनलाइन अर्ज करीत असल्याचे दिसून आले आहे. यामुळे सिडको प्रशासनाचा नाहक वेळ वाया जात असून कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सर्व अटी व शर्ती यांची पूर्तता करणाऱ्या नागरिकांनी विचारपूर्वक अर्ज दाखल करावेत, अशी अपेक्षा सिडकोकडून व्यक्त केली जात आहे. अनामत रक्कम म्हणून बांधकाम खर्चाच्या १० टक्के रक्कम आकारण्यात यावी, असा मतप्रवाह सिडको वर्तुळात आहे, पण या निर्णयावर अद्याप शिक्कामोर्तब झालेले नाही. त्यामुळे २५ लाख रुपये किमतीच्या घरासाठी अडीच लाख रुपये अनामत रक्कम भरावी लागणार आहे.

# नवीन पनवेल येथे आरोग्य शिबिर



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक १७, नवीन पनवेल, सेक्टर १३ येथे भव्य स्वरूपात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. परिसरातील नागरिकांनी या शिबिरात मोठ्या संख्येत उपस्थित राहून आरोग्याची तपासणी करून घेतली.

या वेळी प्रभाग समिती सभापती सुशीला घरत, नगरसेविका अ‍ॅड. वृषाली जितेंद्र वाघमारे, चारुशीला घरत, राजश्री वावेकर, पालिका वैद्यकीय अधिकारी डॉ. अनंत गोसावी, डॉ. रेहाना मुजावर, डॉ. शुभम पाटील, डॉ. कीर्ती समुद्र आदी उपस्थित होते.

## निवडक

### ट्रान्सफॉर्मरमधून ऑईलची चोरी

**पनवेल :** तळोजा औद्योगिक वसाहतीमधील चॅम्पियन स्टील इंडिया प्रा.लि. कंपनीच्या आवारात असलेल्या ट्रान्सफॉर्मरमधून तांब्याच्या वायरिंग कॉईल व ४०० लीटर ट्रान्सफार्मर ऑईल असा मिळून तीन लाख ४० हजार रुपये किमतीच्या मालाची अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना घडली आहे. मोहन कदम (५३) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार चॅम्पियन स्टील इंडिया प्रा.लि. कंपनीच्या आवारात असलेल्या ट्रान्सफार्मरमधून तांब्याच्या वायरिंग कॉईल व ४०० लीटर ट्रान्सफॉर्मर ऑईलची चोरी अज्ञात चोरट्यांनी केली आहे. याबाबतचा गुन्हा तळोजा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि राजेंद्र जाधव करीत आहेत.

### तळोजात घरातून गांजा हस्तगत

**पनवेल :** गांजा हा अमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने राहत्या घरात स्वतःकडे बाळगून ठेवणाऱ्या एका इसमास तळोजा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अक्रम हुसेन अब्दुल जलील खान (३२ रा. पाटीलवाडी, पालेखुर्द) या ठिकाणी त्याच्या ताब्यामध्ये गांजा हा अमली पदार्थ असून सदर मालाची तो विक्री करण्यासाठी स्वतःजवळ बाळगत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा वपोनि सय्यद यांना मिळताच पोलीस उपनिरीक्षक विजय शिंगे, पो. हवा. संतोष गायकवाड, पो. उपनिरीक्षक अनंत लांब आदींच्या पथकाने या ठिकाणी छापा टाकून त्या इसमाकडून ५० हजार ४०० रुपये किमतीचा दोन किलो ८० ग्रॅम वजनाचा गांजा हस्तगत केला आहे. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### उड्डाणपुलावर सिमेंटचा बल्कर अडकला



**पनवेल :** पनवेल शहराजवळून जाणाऱ्या एका उड्डाणपुलावर सिमेंटचा बल्कर अडकल्याने या वाहनाचे नुकसान झाले आहे. तर या अपघातात कोणीही जखमी झाला नाही. शहरातील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपुलावरून एक सिमेंटचा बल्कर जात असताना वाहनचालकाचा ताबा सुटून तो रस्त्याच्या दुभाजकावर जाऊन अडकला. यात वाहनाचे नुकसान झाले आहे, परंतु कोणीही जखमी झाले नसल्याची माहिती मिळत आहे.

### वाहनाच्या धडकेत स्कूटीचालक ठार

**पनवेल :** मुंब्राकडून पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने पुढे जाणाऱ्या स्कूटीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात स्कूटीचालक गिरधारी सिंग (३०) जागीच ठार, तर त्याचा लहान भाऊ कामेश्वर सिंग गंभीर जखमी झाल्याची घटना कळंबोली येथे घडली. कळंबोली पोलिसांनी या अपघाताबाबत अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

# विक्रांत पाटील यांच्या विकासकामांचा लोकार्पण सोहळा

**पनवेल : बातमीदार**

प्रभाग १८ चे कार्यतत्पर नगरसेवक विक्रांत बाळासाहेब पाटील हे नेहमीच विकासकामे आणि नावीन्यपूर्ण उपक्रम यासाठी कार्यरत असतात. प्रभागातील काही महत्त्वपूर्ण विकासकामांचा लोकार्पण सोहळा ठाणा नाका रोड येथे झाला.

ठाणा नाका रोड वरील काही सोसायट्यांना जाणाऱ्या रस्त्यावर स्ट्रीट लाईटची संख्या कमी असल्यामुळे या भागात थोडासा अंधार पडत होता. यामुळे रहदारीस त्रास होत होता. या परिसरातील सोसायट्यांच्या नागरिकांनी हा विषय कार्यक्षम नगरसेवक विक्रांत पाटील यांच्याकडे मांडला. विक्रांत पाटील यांनी तत्काळ या विषयात लक्ष घालून आपल्या नगरसेवक निधीमधून येथे ५ स्ट्रीट लाईटची तरतूद करून घेतली आणि त्याचे लोकार्पण करण्यात आले. आपली मागणी लवकरात लवकर पूर्ण करून दिली त्याबद्दल रहिवाशांनी नगरसेवक विक्रांत पाटील यांचे आभार मानले आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# खोपटे नवेनगर क्षेत्राबाबत ग्रामस्थांनी घेतली माहिती

**उरण : वार्ताहर**

नैना खोपटा टाऊन प्लॅनिंगच्या ऑफीसर प्रांजली केणी यांच्यासोबत खोपटा टाऊन प्लॅनिंगबाबत उरणमधील नागरिक, ग्रामस्थांनी माहिती घेतली. त्यांनी प्लॅनिंगची माहिती मिळावी याबाबत निवेदनही दिले.



खोपटा टाऊन प्लॅनिंग हे ३२ गावातील गावाकऱ्यांना विश्वासात घेऊन करायचे आहे. उदाहरणार्थ गावात रस्ते, मैदान, शाळा, मंदिर, स्मशानभूमी, हॉस्पिटल, गटारे या सुविधा गावाकऱ्यांनी सुचवायच्या आहेत. डेव्हलपमेंट प्लॅन तयार होईल. याबाबतीत त्यांचे प्रतिनिधी दिवान पवार गावोगावी येऊन याबाबतची माहिती गावकऱ्यांना देतील, अशी माहिती चर्चेदरम्यान देण्यात आली.

नैनाच्या ऑफीसर केणी यांनी सांगितले की, राज्य सरकारने त्यांना नैना खोपटे टाऊन प्लॅनसाठी सूचना दिल्या आहेत. गावकऱ्यांशी चर्चा करून प्लॅन करायचा आहे. तीन वर्षांत गावकरी सहमत असतील तर प्लॅन तयार होईल. गावकरी तयार असतील तरच खोपटा टाऊन प्लॅन तयार होईल अन्यथा होणार नाही, अशा प्रकारे केणी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या वेळी भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, आवरे गावातील माजी उपसरपंच हरेश म्हात्रे, वशेणी गावातील सामाजिक कार्यकर्ते शशीकांत पाटील हे उपस्थित होते.

# उरण महाविद्यालयाच्या वतीने चिरनेर येथे ग्रंथालयाची स्थापना

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. चिरनेर हे महाविद्यालयाचे दत्तक गाव आहे. या गावात महाविद्यालयाच्या वतीने नेहमीच विविध उपक्रम राबवले जातात.

लोकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने हा अनोखा उपक्रम हाती घेण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते श्रीधर मोकल, सरपंच संतोष चिर्लेकर, उपसभापती शुभांगी पाटील, ग्रामविकास अधिकारी रमेश पोफेरकर, महेश पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. या वेळी रु. १३,६१४ किमतीची एकूण १४७ पुस्तके ग्रामपंचायतीकडे सुपूर्द करण्यात आली.

या वेळी प्रगट वाचन करण्यात आले. यात मनीषा शर्मा, अक्षिता विमल, शुभांगी पाटील, प्रा. व्ही. एस. इंदूलकर, प्रा. डॉ. ए. आर. चव्हाण, विशाल पाटेकर, महेश पवार, प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे, प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड आदींनी विविध ग्रंथांचे व कवितांचे प्रगट वाचन केले.

या ग्रंथालय उद्घाटन सोहळ्यात उपसरपंच प्रियंका पाटील, ग्रामपंचायत सदस्य सविता केणी, किरण कुंभार, सचिन घबाडी, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विशाल पाटेकर, प्रा. एच. के. जगताप, प्रा. मयूरी मढवी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. अरुण चव्हाण यांनी मानले.




# फुंडे हायस्कूलमध्ये संत गाडगेबाबा पुण्यतिथी आणि राष्ट्रीय गणितोत्सव



**उरण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील तु. ह. वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवारी (दि. २०) संत शिरोमणी गाडगे महाराजांची पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यासोबत राष्ट्रीय गणितोत्सव साजरा करण्यात आला.

विद्यालयाचे चेअरमन कृष्णा कडू, प्राचार्य एम. एच. पाटील, पर्यवेक्षक जी. सी. गोडगे, एस. जी. म्हात्रे, सांस्कृतिक विभागप्रमुख एच. एन. पाटील, दर्शना माळी, व्ही. डी. पाटील यांच्या हस्ते गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यालयात राष्ट्रीय गणितोत्सव ही अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. गणित विषय प्रमुख साधना पाटील, एस. एस. घोडके, आर. एन. पाटील, सुहास नाईक यांनी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांना राष्ट्रीय गणितोत्सवाची माहिती सांगितली.

राष्ट्रीय गणितोत्सवानिमित्ताने विद्यालयात रांगोळी आणि चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी गणितीय संकल्पना स्पष्ट करणाऱ्या सुंदर रांगोळ्या, तसेच चित्रांचे रेखाटन केले. त्याचप्रमाणे प्रत्येक वर्गाशिक्षकांनी आपापल्या वर्गात गाडगेबाबांच्या कार्याची माहिती सांगितली. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी शालेय परिसराची स्वच्छता केली. शेवटी रांगोळी स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# बार कौन्सिलचे अ‍ॅड. गजानन चव्हाण यांचा पनवेल वकील संघटनेतर्फे सत्कार

**पनवेल : प्रतिनिधी**

बार कौन्सिल महाराष्ट्र आणि गोवाचे चेअरमन अ‍ॅड. गजानन चव्हाण आणि व्हाईस चेअरमन अ‍ॅड. संग्राम देसाई यांनी सोमवारी (दि. २१) रोजी पनवेल कोर्टाला भेट दिली असता त्यांचा पनवेल वकील संघटनेतर्फे सत्कार करण्यात आला.




बार कौन्सिल महाराष्ट्र आणि गोवाचे चेअरमन अ‍ॅड. गजानन चव्हाण आणि व्हाईस चेअरमन अ‍ॅड. संग्राम देसाई यांनी सोमवारी संध्याकाळी पनवेल कोर्टात वकिलांची भेट घेतली. या वेळी त्यांचा संघटनेतर्फे सत्कार करण्यात आला. पनवेल वकील संघटना आणि अधिवक्ता परिषदेचे अध्यक्ष अ‍ॅड. मनोज भुबळ यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. अ‍ॅड. दीपक गायकवाड यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. या वेळी बार कौन्सिलच्या माध्यमातून वकिलांकरिता सुरू असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती त्यांनी दिली.

या वेळी पनवेल वकील संघटना आणि अधिवक्ता परिषद पनवेलचे पदाधिकारी, पनवेल-उरण येथील ज्येष्ठ व नवोदित विधिज्ञ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अ‍ॅड. सुनील तेलंगे यांनी केले, तर आभार अ‍ॅड. संतोष पवार यांनी मानले.

# पोलीस ठाण्याच्या माध्यमातून अल्पसंख्याक हक्क दिन

**पनवेल : बातमीदार**

अल्पसंख्याक हक्क दिनाच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये मुसलमान नाका या ठिकाणी मुस्लिम बांधवांचे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गुन्हे संजय जोशी व इतर सहकाऱ्यानी या चर्चासत्रामध्ये अल्पसंख्याकांचे घटनात्मक व कायदेशीर अधिकार याबाबत माहिती देऊन मार्गदर्शन केले, तसेच मुस्लिम बांधवाना गुलाब पुष्प देऊन सन्मानित करून शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी सुमारे ३० ते ४० मुस्लिम बांधव उपस्थित होते.



# दिल्ली येथील सोहळ्यात हर्षला तांबोळी यांना दोन पुरस्कार

**पनवेल : बातमीदार**

डायडम मिसेस इंडिया लेगसी २०२१ या स्पर्धेत नवी मुंबई-पनवेल येथील हर्षला योगेश तांबोळी यांना पीपल चॉईस हा किताब आणि ब्युटी विथ पर्पज हा ताज असे दोन पुरस्कार मिळाले आहेत. याबद्दल त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन केले जात आहे.



डायडम मिसेस इंडिया लेगसी ही सौंदर्य स्पर्धा दिल्ली येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत संपूर्ण देशभरातून अनेक महिला सहभागी झाल्या होत्या. या वेळी महाराष्ट्रातून चार महिलांची या स्पर्धेसाठी निवड झाली होती. नवी मुंबई-पनवेल मधून हर्षला योगेश तांबोळी यांची या अंतिम स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. या स्पर्धेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे महिलांना होणारे मासिक त्रास आणि अडचणी याबद्दल जनजागृती करणे असा होता. हर्षला तांबोळी यांनी यापूर्वी अनेक सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदवला आहे, तसेच महिलांच्या समस्या जाणून घेतलेल्या आहेत. त्यांना सामाजिक कार्याची आवड आहे. स्वर्गीय नारायण लक्ष्मण तांबोळी या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून हर्षला तांबोळी आणि योगेश तांबोळी अनेक उपक्रम राबवत असतात.

दोन पुरस्कार मिळाल्याबद्दल हर्षला तांबोळी यांचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## संपादकीय

# हिवाळी नव्हे, वादळी!

अवघ्या आठवड्याभरात हिवाळी अधिवेशन गुंडाळण्याच्या इराद्याने महाविकास आघाडी सरकारने मुंबईमध्ये सभागृहाचे कामकाज सुरू केले खरे, परंतु येत्या आठवड्याभरात कशाकशाला तोंड द्यायला लागणार आहे याची चुणूक सत्ताधाऱ्यांना पहिल्या दिवशीच मिळाली असेल. पहिल्याच दिवशी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि विधान परिषदेमध्ये प्रवीण दरेकर यांनी सत्ताधारी महाविकास आघाडीला जबरदस्त धारेवर धरले. फडणवीस यांच्या तोफखान्यापुढे सत्ताधारी अक्षरश: हतबल झालेले बघायला मिळाले.

**विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांनी विरोधकांच्या हातात आयताच मुद्दा आणून दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर अकारण टीका करताना ऐन सभागृहामध्ये अंगविक्षेप करत त्यांनी मोदी यांची नक्कल करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे संतापलेल्या भाजपच्या सदस्यांनी त्यांचा यथेच्छ धिक्कार केला. पंतप्रधान हे फक्त माझ्या एकट्याचे नाहीत तर ते साऱ्या देशाचे आहेत हे लक्षात घ्यायला हवे. त्यांचा असा अधिक्षेप सहन केला जाणार नाही. आमदार भास्कर जाधव यांचे वर्तन आक्षेपार्ह असून त्यांना ताबडतोब निलंबित करावे, अशी मागणी देवेंद्र फडणवीस यांनी केली. काही काळ सभागृहात गोंधळ होऊन कामकाज स्थगित करावे लागले. त्यानंतर भास्कर जाधव यांनी सभागृहाची भावना दुखावल्याबद्दल बिनशर्त माफी मागितली. भाषणाच्या ओघात मी केलेले अंगविक्षेप आणि माझे शब्द मी मागे घेतो, असेही ते म्हणाले, परंतु अंगविक्षेप कसे काय मागे घेता येऊ शकतात असा सवाल विरोधकांनी उपस्थित केला. भास्कर जाधव यांच्यामुळे सरकार बॅकफूटवर गेल्याचे बघायला मिळाले. त्याआधी सकाळच्या सत्रात अध्यक्ष निवडीसाठी नियमात बदल करण्याचा डाव रचल्याबद्दल फडणवीस यांनी सरकारवर खरपूस टीका केली. स्वत:च्याच आमदारांना इतके घाबरणारे सरकार महाराष्ट्राच्या इतिहासात कधीही पाहिले नाही हे फडणवीस यांचे वक्तव्य अतिशय वास्तवदर्शी आहे. विधानसभा अध्यक्षांची निवड नेहमीच गुप्त मतदान पद्धतीने होते. विधिमंडळाच्या स्थापनेपासूनच ही परंपरा चालू आहे, पण इतिहासात प्रथमच महाविकास आघाडी सरकारने ती निवड आवाजी मतदानाने करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठीचा प्रस्ताव अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीच सादर करण्यात आला. विधानसभेत महाविकास आघाडीकडे पूर्ण बहुमत आहे. तरीही त्यांना गुप्त मतदान का टाळावेसे वाटले, हा खरा सवाल आहे. गुप्त मतदान झाल्यास आपलेच आमदार फुटतील ही भीती महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या मनामध्ये गेली दोन वर्षे घर करून आहे. कोरोना काळामुळे या वास्तवाला तोंड देण्याची वेळ मविआ सरकारवर आली नव्हती, कारण अध्यक्ष निवडीचे गुप्त मतदान यशस्वीरित्या पार पाडू शकू याचा आत्मविश्वासच या सरकारमध्ये नाही. मुळात हे सरकार लोकशाही मार्गाने नव्हे; तर मागल्या दाराने आले. शिवसेना-भाजप युतीला जनतेने स्पष्ट बहुमत दिले होते, पण जनतेचा कौल धुडकावून, तीन नापास मुलांनी आपल्या तुटपुंज्या मार्कांची बेरीज करून एकत्रित उत्तीर्ण झाल्याचे घोषित करावे तशातला प्रकार झाला. आडमार्गाने सत्तेवर आलेले सरकार आडमार्गानेच टिकून राहू शकते. घोडेबाजार होऊ नये म्हणून हे पाऊल उचलल्याचे काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले सभागृहातील चर्चेत म्हणाले. स्वत:च्या आमदारांनाच विकाऊ घोडे समजणाऱ्या या सरकारचे नेमके काय करायचे हा प्रश्न महाराष्ट्राची जनता योग्य वेळी सोडवेलच.**

# योगव्रती 'बाबा'!

गेली ३२ वर्षे पनवेलकरांना निरामय आरोग्याचा 'योगमंत्र' देत, त्यांना फिट अँड फाइन ठेवण्याचा वसा घेतलेले योगकेंद्राचे संस्थापक, संचालक पु. ल. भारद्वाज अर्थातच समस्त पनवेलकरांना बाळासाहेब भारद्वाज आणि तमाम योगप्रेमींना 'बाबा' या नावाने सुपरिचित असलेल्या बाबांचे मंगळवारी (दि. २१) अल्पशा आजाराने पनवेल येथे निधन झाले. वय वर्षे अवघे ९६ असलेले बाबा किरकोळ आजार वगळता अगदी तंदुरुस्त होते आणि शंभरीच काय शंभरीच्याही पुढे वाटचाल करतील अशीच सर्वांची अटकळ होती, पण नियतीच्या मनात काही वेगळंच असावं.

मुंबईच्या योग विद्या निकेतनचे संस्थापक योगाचार्य पद्मश्री सदाशिवराव निंबाळकर यांच्यावर नितांत श्रद्धा असणाऱ्या आणि त्यांच्याच कार्यातून प्रेरणा घेऊन पनवेलमध्ये योग केंद्र स्थापन करणाऱ्या भारद्वाज यांनी निवृत्तीनंतर आराम न करता ३२ वर्षांपूर्वी आपल्या शहरातही एक योग केंद्र असावं असं स्वप्न पाहिलं. फिटनेसचं महत्त्व आज लोकांना कळलंय पण भारद्वाज यांना योग आणि मानसिक-शारीरिक स्वास्थ्याचं महत्त्व ३२ वर्षांपूर्वीच उमगलं होतं. योग विद्या



निकेतन येथे योगविद्येचे प्रशिक्षण घेऊन मोजक्या सहकाऱ्यांसह त्यांनी १९८९मध्ये पनवेलच्या योग केंद्राची मुहूर्तमेढ रोवली. आज या रोपाचं रूपांतर मोठ्या वटवृक्षात झालं आहे. आज ५० समर्पित, निष्ठावान योगशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली योगाभ्यास आणि सूर्यनमस्कारांचे १५ वर्ग सुरू आहेत.

हजारो विद्यार्थ्यांनी जिथे योगाभ्यासाचे प्रशिक्षण घेतले आणि घेत आहेत त्याला योग केंद्र नाही, खरं तर 'योग विद्यालय'च म्हणायला हवं. या उत्तुंग यशाचे मानकरी आहेत दूरदर्शीपणा, वक्तशीरपणा, सातत्य, चिकाटी अशा अनेक गुणांनी युक्त असणारे आणि 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' हे वचन सार्थ करणारे भारद्वाज सर. त्यांनी 'लोका सांगे ब्रह्मज्ञान' हा प्रकार केला नाही. ते स्वतः योगाभ्यासी आहेत, हे त्यांच्या हालचाली, उत्साह आणि एकूणच फिटनेस पाहून समजून येई. योगाभ्यासाचे फायदे त्यांच्याकडे बघूनच लोकांना कळे.

योग आणि आरोग्याला वाहिलेले 'योगसखा' हे मासिक योग केंद्रातर्फे गेली १८ वर्षे सातत्याने आणि न चुकता दर एक तारखेला प्रकाशित होत आहे. कोणतीही गोष्ट सुरू करणे सोपे असते, ती टिकविणे, त्यात दर्जा राखणे खूप अवघड असते. पण बाबा त्याच उत्साहाने त्याचे संपादन करीत असत. लेखकांकडून लेख मागविणे, ते छपाईसाठी प्रेसमध्ये देणे, लेखांचे प्रूफरीडिंग करणे ही कामे ते अगदी काल-परवापर्यंत मोठ्या उत्साहाने करीत असत. 'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे' हे बाबांनी कृतीने दाखवून दिले.



त्यांच्या कार्यपद्धतीतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांची सकारात्मक दृष्टी. एखादं काम, कार्यक्रम, योजना त्यांनी ठरवली की ती ते पूर्ण करणारच. सबबी सांगणे, ढिलाई त्यांना आवडत नसे. एखादी कल्पना मांडण्यापूर्वी त्यांनी तिचा सर्व अंगांनी विचार केलेला असे त्यामुळे त्या योजनेच्या यशस्वितेषियी कुणी शंका उत्पन्न केलीच, तर त्यावर त्यांच्याकडे उपाय, मार्ग असायचाच.

'योगविद्या गावोगावी' हे ब्रीदवाक्य आणि 'योग साक्षरता' हे ब्रीद मूर्तरूपात आणताना त्यांनी योगकेंद्राच्या कक्षा आपल्या अविश्रांत कष्टातून पेण, उरण, कर्जतपर्यंत विस्तारल्या. पनवेल परिसरातील तब्बल १३० शाळांमध्ये योगविद्या व सूर्यनमस्काराची ओळख करून देऊन आरोग्यसंपन्न समाजाच्या घडणीत त्यांनी अमूल्य योगदान दिलं आहे. मात्र या सगळ्याचं श्रेय ते नेहमीच शिक्षकांना देत हा त्यांचा मोठेपणा.


कुठलाही कार्यक्रम वेळेवरच सुरू व्हावा आणि वेळेतच संपवावा हा त्यांचा कटाक्ष नव्हे दंडक असे. म्हणून एरवी कुठल्याही कार्यक्रमाला उशिरा जाणारे पाहुणे, वक्ते योग केंद्राच्या कार्यक्रमाला सहसा उशीर करीत नाहीत. भारद्वाज सरांचा हा जो धाक होता तो खूप बोलका होता.

तीन वर्षांपूर्वी त्यांनी शाळा-कॉलेजातील ५,००० विद्यार्थ्यांच्या सूर्यनमस्कार महाशिबिराचं स्वप्न पाहिलं. नुसती स्वप्ने बघून भागत नाही, ती पूर्ण करण्यासाठी अतोनात कष्टही घ्यावे लागतात. प्रथम आपले स्वप्न त्यांनी कार्यकर्त्यांनाही दाखवलं, त्याचे मोल पटवून दिले आणि संपूर्ण योग केन्द्र झपाट्याने कामाला लागले. योग शिक्षकांची टीम घेऊन ते स्वत: शाळा-कॉलेजांमध्ये गेले आणि विद्यार्थ्यांना सूर्यनमस्कारांचे प्रशिक्षण दिलं. उन्हातान्हाची पर्वा न करता, न कंटाळता, न थकता किमान चार-पाच वेळा प्रत्येक शाळेत ते गेले आणि अखेर तो स्वप्नपूर्तीचा दिवस उजाडला. त्या रम्य सकाळी पनवेलकरांना एक अभूतपूर्व दृष्य पहायला मिळाले. पनवेलच्या मिडल क्लास सोसायटीचे भव्य मैदान शाळा-कॉलेजच्या तब्बल ५,००० विद्यार्थ्यांनी फुलून गेले होते. आमदार प्रशांत ठाकूर, पनवेलच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे, अनेक नगरसेवक आणि शेकडो प्रतिष्ठित नागरिकांच्या उपस्थितीत हे महाशिबिर उत्साहात पार पडले. पनवेलसाठी हा खरोखरच सुवर्णक्षण होता. कुठेही गडबड, गोंधळ नाही. सर्व काही नियोजनबद्ध, आखीव रेखीव.

हल्लीच्या दिवसात कुणीही आपली खुर्ची, आपले पद सोडायला तयार होत नाही. पण भारद्वाज सर सूर्यकांत फडके यांच्यासारख्या तितक्याच तळमळीच्या व्यक्तीला उत्तराधिकारी नेमून कधीच मोकळे झाले होते. उत्तम अनुयायी तयार करणं हे भारद्वाज आणि योग केंद्राचे मोठे यश आहे. एखादी संस्था उभी करणं सोपं आहे, तिची वाढ, भरभराट करणेही फारसे अवघड नाही. पण या प्रक्रियेमध्ये कार्यकर्त्यांची दुसरी फळी आणि पर्यायी सक्षम नेतृत्व तयार करणे ही मोठी जमेची बाब आहे. योग केंद्राच्या प्रत्येक उपक्रमासाठी अतोनात परिश्रम घेणारे, उत्साही, सक्षम योग शिक्षक व कार्यकर्ते आज योग केंद्राची धुरा समर्थपणे आपल्या खांद्यावर पेलत आहेत. योगाभ्यासाचा जास्तीत जास्त प्रचार आणि प्रसार करणे, शिस्त आणि वक्तशीरपणा बाळगून, त्यांनी आखून दिलेल्या मार्गावरुन मार्गक्रमण करणे हीच भारद्वाज सरांना श्रद्धांजली ठरेल.

मला खात्री आहे, योगाभ्यासामुळे स्वत:ला फिट अँड फाईन राखणारे हजारो पनवेलकर भारद्वाज यांच्या कायम ऋणातच राहतील. भारद्वाज यांना तमाम योगप्रेमींच्या वतीने आदरांजली !

**-जयंत टिळक**



# पोलादपूर नगरपंचायतीसाठी ७१.०९ टक्के मतदान

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर नगरपंचायतीच्या १३ प्रभागात मंगळवारी (दि. २१) निवडणूक घेण्यात आली. तेथे एकूण ७१.०९ टक्के मतदान झाल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली. दरम्यान, माजी सभापती दिलीप भागवत यांच्यासह माजी नगराध्यक्ष नागेश पवार, सुनीता पार्टे यांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले असून उर्वरित चार प्रभागांच्या निवडणुकीनंतर मतमोजणी होणार आहे.

पोलादपूर नगरपंचायतीमध्ये एकूण १७ प्रभाग आहेत. त्यापैकी १३ प्रभागांमध्ये मंगळवारी मतदान घेण्यात आले. तेथे १७३१ पुरुष आणि १९१५ महिला मिळून एकूण ३६४६ मतदार होते. त्यापैकी एक हजार २७२ पुरुष आणि एक हजार ३२० महिला मिळून एकूण दोन हजार ५९२ मतदारांनी मतदान केले.


(छाया : शैलेश पालकर)



| प्रभाग | एकूण मतदार | झालेले मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ४७१ | ८६ | १८.२६ |
| ३ | २२७ | १८५ | ८१.५० |
| ४ | ४५२ | ३२३ | ७१.४६ |
| ५ | २९२ | १९७ | ६७.४७ |
| ६ | २४५ | १८७ | ७६.३३ |
| ७ | ३५४ | २८५ | ८०.५१ |
| ९ | २४१ | १८६ | ७७.१८ |
| ११ | २९४ | २४३ | ८२.६५ |
| १२ | १८८ | १५० | ७९.७९ |
| १३ | २४६ | २०७ | ७४.१५ |
| १५ | २८९ | २३९ | ८२.७० |
| १६ | १२३ | १०७ | ८६.९९ |
| १७ | २२४ | १९७ | ८७.९५ |

# म्हसळा नगरपंचायतीत ४९७८ पैकी ३४१० मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

**म्हसळा : प्रतिनिधी**




येथील नगरपंचायतीच्या १२ प्रभागातील ४९७८पैकी ३४१० मतदारांनी मंगळवारी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये १७६५ महिला तर १६४५ पुरुष मतदारांचा समावेश आहे. सर्वात कमी मतदान प्रभाग क्र. ५मध्ये (५९.१ टक्के) झाले. तेथे ५०९पैकी ३०१ मतदारांनी मतदान केले. तर सर्वात जास्त मतदान प्रभाग क्र.१७मध्ये (८१.२ टक्के) झाले. तेथे ३९२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

म्हसळा नगरपंचायतीच्या २, ७, ८, ९ या चार प्रभागातील निवडणूक स्थगित करण्यात आली आहे. तर प्रभाग क्र. ४मधून सरोज मंगेश म्हशीलकर या बिनविरोध निवडून आल्या आहेत. त्यामुळे मंगळवारी १२ प्रभागात मतदान घेण्यात आले.

# दिवीवाडीमध्ये शिक्षणाची वाडी अभियान

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील महाजने येथील दिवीवाडीमधील आदिवासी मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षणाची वाडी अभियान सुरू करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व शिक्षक संदीप वारगे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत दिवीवाडीमधील प्रत्येक घराच्या भिंतीला गणित, उजळणी, इंग्रजी शब्दांचे फलक लावण्यात आलेत. त्यामुळे खेळता खेळता मुलांना शिक्षणाचे धडे घेता येणार आहेत. या उपक्रमातून मुलांची बौद्धीक क्षमता वाढीबरोबरच त्यांचे पाठांतरही सहज होण्यास मदत होणार आहे.

गेल्या दोन वर्षांपासून कोरोनामुळे शिक्षणावर मोठा परिणाम झालेला आहे. लॉकडाऊनमुळे शाळा बंद होत्या. आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी विद्यार्थ्यांना घराबाहेर पडणे अवघड झाले होते. त्यामुळे शैक्षणिक नुकसानाबरोबरच मुलांच्या सर्वांगीण विकासालासुध्दा मर्यादा येत होत्या. त्यातून मार्ग काढण्यासाठी ऑनलाइन शिक्षण पद्धती स्वीकारली गेली. ऑफलाइन आणि ऑनलाइन शिक्षण पद्धतीने अध्ययन अध्यापन सुरू झाले. तरीही अनेक अडचणी जाणवत होत्या. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे भाषिक मूलभूत अध्ययन कौशल्य व गणिती संबोध यावर परिणाम घडून आलेला दिसत होता. आदिवासी दुर्गम भागात स्मार्ट मोबाइल आणि इंटरनेटची अपुरी सुविधा होती.

१ डिसेंबरपासून शाळा सुरू झाल्या, मात्र विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्तरामध्ये उणिवा दिसून आल्या. जिल्हा परिषदेचे सीईओ डॉ. किरण पाटील यांनी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी नवनवीन प्रयोग व उपक्रमांना चालना देण्यासाठी गुणवत्ता विकास कक्ष सुरू केले. तालुकानिहाय उपक्रमशील शिक्षक निवडून त्याद्वारे विविध कार्यक्रमांची आखणी सुरू केली आहे. उपक्रमशील, तंत्रस्नेही व आदर्श शिक्षक संदीप वारगे यांची जिल्हा समन्वयक म्हणून नियुक्त करून जिल्हा व तालुका स्तरावर टास्कफोर्स तयार केले. या उपक्रमांचा भाग म्हणून जिल्हा समन्वयक वारगे यांनी स्वतःच्या शाळेपासून सुरुवात करीत शिक्षणाची वाडी-दिवीवाडी हा नाविन्य उपक्रम हाती घेतला आहे. मराठी, इंग्रजी व गणित विषयांवर आधारित मूलभूत कौशल्य व संबोध समृद्धी वाढविण्यावर उपक्रमाच्या माध्यमातून भर देण्यात येत आहे.





# सह्याद्री प्रतिष्ठानची किल्ले बिरवाडीवर संवर्धन मोहीम

**पाली : प्रतिनिधी**

सह्याद्री प्रतिष्ठानच्या मुरूड विभागातर्फे ऐतिहासिक बिरवाडी किल्ल्यावर नुकतीच दुर्गसंवर्धन मोहीम राबविण्यात आली. यावेळी गडावरील अनेक वास्तूंचे संवर्धन व स्वच्छता करण्यात आली.

या मोहिमेत गडावरील जोते आणि सदरेच्या दगडांचा ढिग मोकळा करण्यात आला. या विस्कळीत भिंतीचे दगड मुळ बांधणीला न हलवता व्यवस्थित बसविण्यात आले. किल्ल्यावरील बुरुज, पायऱ्या व इतर ठिकाणचे वाढलेले गवत काढण्यात आले. पाण्याची टाकी, गडावरील वास्तू व मंदिर परिसरात स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेत, ऋतिक भोसले, वेदांत भोसले, रोहित चोरघे, आश्विन विरकुड, आविष्कार शिवणकर आदी सभासद सहभागी झाले होते. भविष्यात या किल्ल्याच्या संवर्धनासाठी स्थानिक ग्रामस्थांसोबत चर्चा केली जाईल. व लवकरच पुढील संवर्धन मोहिमेचे आयोजन करण्यात येईल. असे ऋतिक भोसले यांनी सांगितले.



(छाया : धम्मशील सावंत)

### ऐतिहासिक महत्त्व

***जंजिऱ्याच्या सिद्दीला शह देऊन शिवरायांनी इ.स. १६५८ मध्ये हा किल्ला स्वराज्यात सामील केला. मराठे व सिद्दी अशा राजवटी या किल्ल्यावर होऊन गेल्या. किल्ल्याचे बांधकाम सुस्थितीत असून या गडावर पिण्याच्या पाण्याची भरपूर सोय आहे. गडावर संवर्धन कामे वेगाने होणे अपेक्षित आहे.***

# खोपोलीत ब्युटीपार्लर प्रशिक्षण कार्यक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

महिंद्रा सॉन्यो स्पेशल स्टील प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या सामाजिक दायित्व (सीएसआर) विभागातर्फे युवती व महिलासाठी नि:शुल्क अॅडव्हान्स ब्युटीपार्लर प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून, त्याचे उद्घाटन नुकताच कंपनीचे सिनियर व्हाईस प्रेसिडेंट अविनाश सोमवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

कंपनीच्या सीएसआर विभागाचे मॅनेजर विकास गणवीर यांनी प्रास्ताविकात सीएसआर विभागाच्या विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. अविनाश सोमवंशी यांनी प्रशिक्षणार्थीना ब्युटीपार्लरचे फायदे, आंतरिक व बाहेरचे सौंदर्य, व्यक्तीमत्त्व विकास याबाबत मार्गदर्शन केले.

विकास गणवीर यांनी सूत्रसंचालन केले. प्रशिक्षिका वैष्णवी विचारे उपस्थित होत्या. तीन महिने कालावधीच्या या प्रशिक्षण कार्यक्रमात खोपोली नगर परिषद व परिसरातील ३० युवती, महिला सहभागी झाल्या आहेत.

# अलिबाग कृषी पर्यटन विकास संस्थेच्या अध्यक्षपदी मनोज घरत यांची निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**



अलिबाग कृषी पर्यटन विकास संस्थेच्या अध्यक्षपदी थळ येथील सृष्टी फार्मचे संचालक मनोज घरत यांची तर उपाध्यक्षपदी राजाराम पडवळ (किहीम), मानसी चेऊलकर (मांडवा), स्वाती बर्वे (चोंढी) यांची निवड करण्यात आली.

अलिबाग कृषी पर्यटन विकास संस्थेची सर्वसाधारण सभा थळ येथील सृष्टी फार्ममध्ये आयोजित करण्यात आली होती. यावेळी सन २०२१ ते २०२४ करिता कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यात बाळकृष्ण कोळी (सचिव), विजय कदम (सहसचिव), अमिष शिरगांवकर (खजिनदार) यांचा समावेश आहे. तर कार्यकारिणी सदस्य म्हणून कौस्तुभ भिंगार्डे (धोकोवडे), निमीष परब (आवास), प्रिती पाटील (चोंढी), नितीन नाईक (आवास), चंद्रशेखर पडवळ (वरसोली), नितीन घरत (सासवणे), आल्हाद जाधव (आवास), उमेश म्हात्रे (आगरसुरे) यांची निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून दिलीप राऊत यांनी काम पाहिले.

मावळते अध्यक्ष निमिष परब यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष मनोज घरत यांच्याकडे संस्थेची सूत्रे दिली. संस्थेच्या माध्यमातून पर्यटन संस्कृतीला बळ देण्याचे काम मी सहकाऱ्यांसोबत निष्ठेने करील, अशी ग्वाही मनोज घरत यांनी यावेळी दिली.

# कर्जत तालुक्यातील वंजारवाडी पूल धोकादायक

(छाया : संतोष पेरणे)



**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातून नाशिक–शहापूर–मुरबाड–कर्जत–खोपोली–वाकण असा राष्ट्रीय महामार्ग (क्र. ५४८ अ) जात असून त्यावरून सतत अवजड वाहनांची वर्दळ सुरु असते. या महामार्गावरील वंजारवाडी (ता. कर्जत) येथील पूल धोकादायक झाला असून, या पुलाचे तत्काळ स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

कर्जत तालुक्यात या महामार्गाचे रुंदीकरण आणि काँक्रिटीकरणाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सुरू आहे. या महामार्गावर वंजारवाडी येथे पेज नदीवर पूल असून त्यांची निर्मिती १९७०च्या दशकात करण्यात आली आहे. ५० हुन अधिक वर्षे वयोमान झालेल्या या पुलावर नेहमी खड्डे पडतात. त्यामुळे वाहनचालकांना हा पूल धोकादायक वाटत आहे. पुलाच्या दोन्ही बाजूचे रस्ते काँक्रीटचे झाले आहेत. मात्र पुल आणि पुलावरील खड्ड्यांच्या दुरुस्तीचे काम राज्य रस्ते विकास महामंडळ हाती घेत नसल्याचे दिसून येत आहे.

या पुलाच्या नादुरुस्तीबद्दल स्थानिक रहिवासी कृष्णा जाधव यांनी दोनवेळा आवाज उठवला होता. मात्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. आदिवासी भागातील कार्यकर्ते कृष्णा शिंगोळे यांनीही सदर पुलाच्या नादुरुस्तीबद्दल आक्रमक भूमिका घेतली होती.

> **वंजारवाडी पुलाचे महत्त्व लक्षात घेऊन राज्य रस्ते विकास महामंडळाने पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची गरज आहे. या ठिकाणी नव्याने पुलाची गरज असून तात्पुरत्या स्वरूपात किमान दुरुस्ती करून घ्यावी आणि वाहनचालकांना तात्पुरता दिलासा द्यावा.**
>
> **–उदय पाटील, स्थानिक कार्यकर्ते**

# हुश्श... तब्बल सहा दिवसांनी रोहेकरांना मिळाले पाणी!

## नवीन जलवाहिन्यांची तात्पुरती दुरुस्ती

**धाटाव : प्रतिनिधी**



नवीन जलवाहिन्यांच्या फुटलेल्या भागाची तात्पुरती दुरुस्ती केल्यानंतर पिण्याच्या पाण्यासाठी तडफडणाऱ्या रोह्यातील नागरिकांना तब्बल सहा दिवसांनी पाणी मिळाले. मात्र नव्या आणि जुन्या जलवाहिन्यांचा ताळमेळ जुळत नसल्याने पाणीपुरवठा धीम्या गतीने सुरू करण्यात आला आहे.

रोहा नगरपालिकेने सुमारे १२ कोटी रुपये खर्च करून डोलवहाळ ते रोहे या जलवाहिनीचे काम नव्याने केले. गेल्या बुधवारी रोहा–कोलाड मार्गावरील क्लॅरियंट कंपनीजवळ या जलवाहिनीला पुन्हा एकदा भगदाड पडले. त्यामुळे रोहा शहराचा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद झाला. जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम सुरू होते. मात्र नव्या आणि जुन्या जलवाहिनीचा योग्य ताळमेळ बसत नसल्याने दुरुस्तीनंतरही जलवाहिनीला कुठे ना कुठे गळती लागत होती. जलवाहिनीच्या फुटलेल्या भागांच्या दुरुस्तीचे काम कसेबसे पूर्ण केल्यानंतर रोहा नगरपालिकेने सहाव्या दिवशी सकाळी टप्प्याटप्प्याने शहरात पाणी सोडण्यास सुरूवात केली. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी तडफडणाऱ्या रोहेकरांचा जीव भांड्यात पडला. मात्र अजूनही शहरात कमी दाबाने अपुरा पाणी पुरवठा होत आहे.

# शहरातील विविध समस्यांबाबत 'आम्ही खोपोलीकर' आक्रमक

## नगरपालिका कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन

(छाया : अरुण नलावडे)



**खालापूर : प्रतिनिधी**

येथील नागरिकांना अनेक समस्या भेडसावत आहेत. त्याबाबत पत्रव्यवहार करुनदेखील पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे शहरातील समस्या त्वरित सोडवाव्यात या मागणीसाठी 'आम्ही खोपोलीकर आमचं ठरलंय' या सामाजिक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी बुधवार (दि. २२)पासून पालिका कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले.

खोपोली शहराच्या विविध भागातील नागरिकांनी एकत्र येवून 'आम्ही खोपोलीकर आमचं ठरलयं' ही सामाजिक संघटना स्थापन केली आहे. शहरातील विविध नागरी समस्या त्वरित या मागणीसाठी या संघटनेने बुधवारपासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. शहरातील अनेक तरुण या अंदोलनामधे सामील झाले असून, शहरातील नागरी समस्या पालिकेने त्वरित सोडविल्या नाही तर आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

नगरसेवक किशोर पानसरे, अमोल पाटील, खोपोली शहर राष्ट्रवादी काँग्रेस महिला अध्यक्षा सुवर्णा मोरे यांच्यासह काही सामाजिक संघटनांनी आम्ही खोपोलीकर आमच ठरलय या संघटनेच्या धरणे आंदोलनाला यावेळी पाठिंबा दिला.

# रोह्यात गटारात पडून एक जण जखमी

## रिक्षाचालकांनी काढले बाहेर

**रोहे : प्रतिनिधी**

शहरातील मिनीटाऊनसमोर असलेल्या उघड्या गटारात पडल्याने एका इसमाला जबर मार लागला असून, रिक्षाचालकांनी रस्सीच्या सहाय्याने या इसमाला बाहेर काढून त्वरित उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे.



रोहा–कोलाड मार्गावरील मिनीटाऊन हॉलसमोरील गटाराच्या चेंबरवर झाकण नाही. गटारात पडल्याने यदय्या नरसय्या बोकुलो (रा. धाटाव खैरवाडी) यांना जबर मार लागला. रिक्षाचालकांना लक्षात येताच त्यांनी यदय्या बोकुलो यांना रस्सीच्या सहाय्याने बाहेर काढले. त्यांच्या हाताला व पायाला जबर मार लागला असून त्यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रोहा अष्टमी नगर परिषदेने गटारावरील झाकण त्वरित बसविण्याची मागणी होत आहे.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE No.05/2021-22**

The Superintending Engineer (Civil) EHV CCCM Circle, Airoli on behalf of MSETCL (the employer) hereby invites SRM E-tender mentioned below from registered contractors of appropriate class with central or State Govt. /Semi Govt. Department/ PSU and also registered under M.S.E.T.C.L.'s SRM E-Tender registration system on Mahatransco SRM E-Tendering Website.

| Sr.No. | RFx No. | Name of work |
|---|---|---|
| 1 | 7000021729 | Metal spreading, earthing water supply line, P/L RCC Cable trench covers at 220 KV Substation Tambati. |
| 2 | 7000021728 | A] Civil works for maintenance by repairs to existing deteriorated cable trench cum connecting pathway from 220 KV Control room to 100 KV Switchyard at 220 KV Borivali Substation.<br>B] Civil works for providing structural strengthening of existing deteriorated RCC column and beam at 220 KV Trombay Substation. |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in (Guest User)**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm.): Phone No. (022)-27601622 / Mob. No. 9769006183.

**Superintending Engineer (Civil), Airoli**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Tender | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-16/ 7000021433 | Overhauling of ABB make 100kV CB at various EHV Substation under Panvel circle. **1st extension.** | Rs. 97.70 Lakhs |
| Tend-19/ 7000021620 | AMC for restoration of collapse tower of various 400KV,220KV & 100KV lines under jurisdiction of EHV (O&M) Circle Panvel **1st extension** | Rs. 75.00 Lakhs |
| Tend-20/ 7000021524 | Supply of various General Asset material required at various location under EHV (O&M) Circle, Panvel for FY2021-22 **(EMD Rs. 5000) 1st extension** | Rs. 4.93 Lakhs |
| Tend-22/ 7000021415 | Overhauling of ABB make 220kV CB at various EHV Substation under Panvel circle | Rs. 30.08 Lakhs |
| Tend-23/ 7000021710 | Work of Cold line washing/cleaning (manually) of polymer/disc insulator strings and tightening of jumper of various 400kV, 220kV & 100kV under EHV (O&M) Circle, Panvel | Rs. 25.00 Lakhs |
| Tend-24/ 7000021462 | Work of stub strengthening and chimney height raising of 220kV Nagothane- Wadkhal –I & II from loc. No. 39 to 59 in creek area and stub strengthening of 100kV Apta – Jite-Thal D/C line other than creek locations on urgent basis under EHV lines S/Dn. Panvel. | Rs. 64.98 Lakhs |

EMD 1% of estimated cost of each tender & Tender fee Rs.500/- + GST. **Submission of bids from 22.12.2021 to 31.12.2021 up to 11.00 hrs, Opening date:-31.12.2021.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer(Adm) Tel. No. 022-27459625/24. E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-

**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**


# कर्जत रेल्वेस्थानक परिसरात वाहने उभी करणाऱ्यांवर बडगा

## पोलीस आणि आरपीएफकडून ई–चलनाद्वारे दंडात्मक कारवाई





**कर्जत : बातमीदार**

येथील रेल्वेस्थानक परिसरातील नो पार्किंग झोनमध्ये वाहने उभी करणाऱ्या वाहनचालकांवर कर्जत पोलीस, आरपीएफ यांच्या संयुक्त विद्यमाने ई–चलनाद्वारे दंडात्मक कारवाई करण्यात आली.

कर्जत रेल्वेस्थानकाच्या भिसेगाव दिशेकडील पादचारी पुलासमोरील तसेच फलाट क्रमांक एकच्या मुख्य तिकीट खिडकी समोरील नो पार्किंग झोनमध्ये अनेक वाहनधारक बेकायदेशीर पार्किंग करतात. त्याचा प्रवाशांना अडथळा होतो. वेळोवेळी सूचना देऊनही वाहनधारक नो पार्किंग झोनमध्ये वाहने उभी करत असल्यामुळे त्यांच्यावर आता कर्जत पोलीस आणि आरपीएफ यांनी दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहनधारकांसोबत वादविवाद न करता नो पार्किंग झोनमधील सर्व वाहनांवर ई–चलानद्वारे कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

कर्जत रेल्वेस्थानकाच्या भिसेगाव दिशेकडील पादचारी पुलासमोर, तसेच फलाट क्रमांक एकच्या तिकीट खिडकीसमोरील नो पार्किंग झोनमध्ये उभ्या असलेल्या सुमारे ५० दुचाकी वाहनांवर कर्जत पोलीस आणि आरपीएफ यांनी ई–चलनाद्वारे कारवाई केली.

ई–चलनाची कारवाई टाळण्यासाठी वाहनधारकांनी कर्जत रेल्वेस्थानक परिसरात गाडी उभी करीत असताना ती नो पार्किंग झोनमध्ये नाही ना याची खात्री करावी, असे आवाहन कर्जत पोलीस आणि आरपीएफ यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

# पालीत बाप्पाच्या दर्शनाला उसळली गर्दी

## ▪ रांगेत उभे राहून भाविकांनी घेतले बल्लाळेश्वराचे दर्शन

**पाली : प्रतिनिधी**



(छाया : धम्मशील सावंत)

संकष्टी चतुर्थीनिमित्त बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पालीमध्ये बुधवारी (दि. २२) भाविकांची गर्दी उसळली होती. भाविकांनी रांगेत उभे राहून बल्लाळेश्वराचे मनोभावे दर्शन घेतले.

राज्यातील सर्व मंदिरे दर्शनासाठी खुली करण्यात आली आहेत. अष्टविनायक तीर्थक्षेत्रापैकी पालीतील बल्लाळेश्वर मंदिरात बुधवारी संकष्टी चतुर्थीला बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले होते. त्यामुळे मंदिर परिसराला जत्रेचे स्वरूप आले होते. हार, नारळ व प्रसादाची दुकाने, तसेच हॉटेल्स गजबजली होती. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

> **बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांसाठी शुद्ध थंड पाण्याची व सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात आली आहे. रेलिंग व शेड उभारण्यात आली आहे. वाहने उभी करण्यासाठी देवस्थानचे दोन मोफत वाहनतळदेखील आहेत. त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही.**
>
> **–ॲड. धनंजय धारप, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली**

**वाहतूक कोंडी**

*पालीत दाखल झालेल्या भाविकांच्या गाड्यांमुळे वाहतूक कोंडी झाली होती, मात्र पोलीस व बल्लाळेश्वर देवस्थानचे सुरक्षा रक्षक वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न करत होते. पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली पालीतील प्रत्येक नाक्यावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. देवळाच्या शेजारून जाणारी सर्व वाहने भक्तनिवास क्रमांक १ च्या बाजूने वळविण्यात आली होती.*


**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**

जा.क्र. २७/५०४/२०२१ — दिनांक : २३/१२/२०२१

**जाहीर फेरलिलाव नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार पतसंस्थेच्या थकीत कर्जाच्या वसुलीसाठी खालील मिळकत जप्त केली आहे. सदर मिळकत जशी आहे जेथे आहे, या तत्त्वावर खरेदी करू इच्छिणाऱ्या तमाम जनतेस याद्वारे लिलाव बोलीची सूचना देण्यात येते.

**मालमत्तेचे वर्णन**

| कर्जदारांचे नाव व मालमत्तेच्या मालकाचे नांव | मिळकतीची संपूर्ण माहिती | वाजवी मुल्य |
|---|---|---|
| श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर व श्रीमती ज्योती किरण कल्याणकर | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील प्लॉट नं. ५२१/१, २, सब प्लॉट नं. २७ ते ३५, किनारा को. ऑप. हौ. सो. लि. बावन बंगला, पनवेल या इमारतीमधील फ्लॅट नं. सी ३/२, तळमजला, ज्याचे क्षेत्र ५९३.३२ चौ. फुट बिल्टअप | ३५,३२,५८०/– |

**अटी व शर्ती :**

१) सदरचा जाहीर फेरलिलाव दिनांक **०६/०१/२०२२** रोजी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालय कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल रो हाऊस, प्लॉट १, ६२६, मारूती अपार्टमेंट, पनवेल ४१०२०६ येथे निम्नस्वाक्षरीकार यांच्यासमोर सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० या वेळात करण्यात येईल.

२) लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.

३) सदर जाहीर लिलावाच्या प्रक्रियेमध्ये मौजे पनवेल तसेच इच्छुक व्यक्तींना जाहीर लिलावामध्ये सहभाग घेता येईल.

४) लिलाव प्रक्रीयेत भाग घेतलेल्या इच्छुक व्यक्तीस स्थावर मिळकतीची किंमत अंतिम जाहीर बोलीद्वारे निश्चित केलेल्या खरेदी केलेल्या किंमतीच्या रक्कमेपैकी १५% ची रक्कम अनामत म्हणून रोखीने तात्काळ बोली बोलण्याच्या ठिकाणी निम्नस्वाक्षरीकाराकडे भरणा करावी लागेल त्याची पोहोच त्वरीत देण्यात येईल. तर उर्वरीत ८५% ची रक्कम खरेदीच्या किमतीपैकी लिलाव निश्चित झालेल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत संपूर्णपणे भरणा करावी लागेल व त्यासोबत रक्कमेचा भरणा न झाल्यास, कसूर केल्यास त्यासंबंधीत मिळकतीचा तात्काळ स्वरूपात फेरविक्री विक्रीच्या खरेदीच्या करारास आवश्यक असलेली मुद्रांक फी चा भरणा देखील करावा लागेल.

५) जाहीर लिलाव बोली विक्रीच्या दिवशी कोणतीही बोली न झाल्यास अथवा बोली होऊन अनामत रक्कमेचा करण्याचा भरणा न झाल्यास, कसूर केल्यास त्यासंबंधी मिळकतीचा तात्काळ स्वरूपात फेरविक्री करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार राखून ठेवीत आहेत.

६) यशस्वी बोलीधारक यांनी लिलावाच्या अटी/शर्ती पूर्ण करणे जरूरीचे आहे.

७) बोलीधारकाने बोली स्विकारल्यापासून अटी व शर्ती प्रमाणे उर्वरीत व्यवहार ठरविलेल्या मुदतीत पतसंस्थेकडे न केल्यास बोलीपैकी जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

८) कोणतेही कारण न देता लिलाव मंजूर करणे, नामंजूर करणे, रद्द करणे, लिलाव प्रक्रिया स्थगित करणे व पुढे ढकलणे या बाबतचे सर्व अधिकारी विशेष वसुली व विकी अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत. तसेच बोली न झाल्यास पुढील अधिकार देखील राहतील.

९) मालमत्तेच्या हस्तांतरणाची स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन खर्च व इतर थकीत देय संबधित खर्च भागविण्याची जबाबदारी यशस्वी बोलीदार/खरेदीदार ह्यांची राहील.

१०) इच्छुक व्यक्तींना/बोलीधारकांना सदरची मिळकत वर निर्देशित केलेल्या वर्णनानुसार खरेदी करण्यापूर्वी परस्पर / निम्नस्वाक्षरीकारांच्या मदतीने पहावयास मिळेल याबाबत निम्न स्वाक्षरीकार यांच्याकडे संपर्क केल्यास मिळकतीबाबत अधिक माहिती तपशिल देऊन मिळकत पाहण्याची वेळ निश्चित केली जाईल.

**ठिकाण :– पनवेल**
**दिनांक :– २३/१२/२०२१**

**सही/–**
**सुनिल सदानंद गद्रे**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी, महाराष्ट्र स.स. अधिनियम १९६० चे कलम १५६ शी अभिप्रेत**
**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**

जा.क्र. २७/५०५/२०२१ — दिनांक : २३/१२/२०२१

**जाहीर फेरलिलाव नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार पतसंस्थेच्या थकीत कर्जाच्या वसुलीसाठी खालील मिळकत जप्त केली आहे. सदर मिळकत जशी आहे जेथे आहे, या तत्त्वावर खरेदी करू इच्छिणाऱ्या तमाम जनतेस याद्वारे लिलाव बोलीची सूचना देण्यात येते.

**मालमत्तेचे वर्णन**

| कर्जदारांचे नाव व मालमत्तेच्या मालकाचे नांव | मिळकतीची संपूर्ण माहिती | वाजवी मुल्य |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण मनु चेहरा श्रीमती ज्योती किरण कल्याणकर | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील प्लॉट नं. ५२१/१, २, सब प्लॉट नं. २७ ते ३५, किनारा को. ऑप. हौ. सो. लि. बावन बंगला, पनवेल या इमारतीमधील ब्लॉक नं. १, तळमजला, बी/२ विंग, क्षेत्र ४२०.३४ चौ. फुट | ३१,८६,०००/– |

**अटी व शर्ती :**

१) सदरचा जाहीर फेरलिलाव दिनांक **०६/०१/२०२२** रोजी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालय कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल रो हाऊस, प्लॉट १, ६२६, मारूती अपार्टमेंट, पनवेल ४१०२०६ येथे निम्नस्वाक्षरीकार यांच्यासमोर सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० या वेळात करण्यात येईल.

२) लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.


३) सदर जाहीर लिलावाच्या प्रक्रियेमध्ये मौजे पनवेल तसेच इच्छुक व्यक्तींना जाहीर लिलावामध्ये सहभाग घेता येईल.

४) लिलाव प्रक्रीयेत भाग घेतलेल्या इच्छुक व्यक्तीस स्थावर मिळकतीची किंमत अंतिम जाहीर बोलीद्वारे निश्चित केलेल्या खरेदी केलेल्या किंमतीच्या रक्कमेपैकी १५% ची रक्कम अनामत म्हणून रोखीने तात्काळ बोली बोलण्याच्या ठिकाणी निम्नस्वाक्षरीकाराकडे भरणा करावी लागेल त्याची पोहोच त्वरीत देण्यात येईल. तर उर्वरीत ८५% ची रक्कम खरेदीच्या किमतीपैकी लिलाव निश्चित झालेल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत संपूर्णपणे भरणा करावी लागेल व त्यासोबत रक्कमेचा भरणा न झाल्यास, कसूर केल्यास त्यासंबंधीत मिळकतीचा तात्काळ स्वरूपात फेरविक्री विक्रीच्या खरेदीच्या करारास आवश्यक असलेली मुद्रांक फी चा भरणा देखील करावा लागेल.

५) जाहीर लिलाव बोली विक्रीच्या दिवशी कोणतीही बोली न झाल्यास अथवा बोली होऊन अनामत रक्कमेचा करण्याचा भरणा न झाल्यास, कसूर केल्यास त्यासंबंधी मिळकतीचा तात्काळ स्वरूपात फेरविक्री करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार राखून ठेवीत आहेत.

६) यशस्वी बोलीधारक यांनी लिलावाच्या अटी/शर्ती पूर्ण करणे जरूरीचे आहे.

७) बोलीधारकाने बोली स्विकारल्यापासून अटी व शर्ती प्रमाणे उर्वरीत व्यवहार ठरविलेल्या मुदतीत पतसंस्थेकडे न केल्यास बोलीपैकी जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

८) कोणतेही कारण न देता लिलाव मंजूर करणे, नामंजूर करणे, रद्द करणे, लिलाव प्रक्रिया स्थगित करणे व पुढे ढकलणे या बाबतचे सर्व अधिकारी विशेष वसुली व विकी अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत. तसेच बोली न झाल्यास पुढील अधिकार देखील राहतील.

९) मालमत्तेच्या हस्तांतरणाची स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन खर्च व इतर थकीत देय संबधित खर्च भागविण्याची जबाबदारी यशस्वी बोलीदार/खरेदीदार ह्यांची राहील.

१०) इच्छुक व्यक्तींना/बोलीधारकांना सदरची मिळकत वर निर्देशित केलेल्या वर्णनानुसार खरेदी करण्यापूर्वी परस्पर / निम्नस्वाक्षरीकारांच्या मदतीने पहावयास मिळेल याबाबत निम्न स्वाक्षरीकार यांच्याकडे संपर्क केल्यास मिळकतीबाबत अधिक माहिती तपशिल देऊन मिळकत पाहण्याची वेळ निश्चित केली जाईल.

**ठिकाण :– पनवेल**
**दिनांक :– २३/१२/२०२१**

**सही/–**
**सुनिल सदानंद गद्रे**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी, महाराष्ट्र स.स. अधिनियम १९६० चे कलम १५६ शी अभिप्रेत**
**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**

### किशोर–किशोरी राज्य कबड्डी स्पर्धा

# रायगडचा संघ बाद फेरीत

**परभणी : प्रतिनिधी**

यजमान परभणीसह पुणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, ठाणे, पालघर, कोल्हापूर, सांगली या जिल्ह्यांच्या संघांनी ३२व्या किशोर–किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या दोन्ही गटांत बाद फेरी गाठली, तर सोलापूर, नाशिक, रत्नागिरी, सिंधुदुर्ग यांनी किशोरी आणि सातारा, जालना नंदुरबार, औरंगाबाद, अहमदनगर, हिंगोली व जळगाव यांनी किशोर गटात बाद फेरीत प्रवेश केला.



परभणीतील पाथरी येथील कबड्डीमहर्षी बुवा साळवी क्रीडानगरीत सुरू असलेल्या मुलींच्या इ गटात ठाण्याने रत्नागिरीला ३०–२८ असे चकवित या गटात अग्रक्रम पटकाविला, तर रत्नागिरीने उपविजयी होत बाद फेरी गाठली. ठाण्याकडून प्रतीक्षा सणस, गौरी मांझी, तर रत्नागिरीकडून सारा शिंदे, पूर्णा दळवी यांनी उत्कृष्ट खेळ केला. द गटात कोल्हापूरने साताऱ्याला ३४–३० असे पराभूत करीत उपविजयी म्हणून बाद फेरी गाठली. रायगडने सोलापूरला ४७–४७ असे बरोबरीत रोखल्यामुळे या दोन्ही संघांनी बाद फेरी गाठली. फ गटात नाशिकने सिंधुदुर्गला ५९–१८ असे पराभूत करून या गटात अव्वल स्थान मिळवित बाद फेरी गाठली. सिंधुदुर्गदेखील उपविजयी ठरले.

मुलांच्या ड गटात नंदुरबारने मुंबई उपनगरला ४५–३० असे पराभूत केले. सिद्धार्थ मुरूमकर, विश्वजित साळुंखे नंदुरबारकडून, तर भावेश चिंदरकर, अर्षद चौधरी उपनगरकडून उत्तम खेळले. इ गटात कोल्हापूरने औरंगाबादला ३६–३२ असे पराभूत करीत बाद फेरी गाठली. शुभम रेपे, प्रेम पाटील या विजयात चमकले. दीपक डाके, संघर्ष इंगोले छान खेळले. फ गटात अहमदनगरने सांगलीला बरोबरीत रोखत बाद फेरीतील आपला मार्ग सुकर केला. सौरभ सिरसाट, गणेश नरवडे नगरकडून, तर युनास पिरजादे, अमित फाळके सांगलीकडून उत्तम खेळले. अ गटात साताऱ्याने ठाण्याला ५५–२०असे नमवित या गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला. ब गटात पुण्याने श्रीधर कदम, यश करपे यांच्या चतुरस्त्र खेळाच्या जोरावर सिंधुदुर्गला ४७–१७ असे नमवले. सतीश मांजरेकर पराभूत संघाकडून उत्तम खेळला.

## ऑस्ट्रेलियाचा लाबूशेन कसोटी क्रमवारीत बनला अव्वल फलंदाज

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) जाहीर केलेल्या ताज्या कसोटी क्रमवारीत ऑस्ट्रेलियन संघाचा स्टार फलंदाज मार्नस लाबुशेन याने इंग्लिश कर्णधार जो रूटला मागे टाकत अव्वल क्रमांक पटकाविला आहे. त्याचबरोबर गोलंदाजीत ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने अव्वल गोलंदाजांच्या कसोटी क्रमवारीत नवव्या स्थानावर झेप घेतली आहे.

लाबुशेनचे ९१२ रेटिंग गुण आहेत, तर रूट ८९७ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. स्टीव्ह स्मिथ (८८४) तिसऱ्या, केन विल्यमसन (८७९) चौथ्या आणि रोहित शर्मा (७७५) पाचव्या स्थानावर आहे. त्याचबरोबर भारतीय कर्णधार विराट कोहली एका स्थानाने खाली घसरला असून तो आता ७५६ रेटिंग गुणांसह सातव्या स्थानी आहे.

## आरोग्य प्रहर

### मासिक पाळीच्या त्रासावर काही घरगुती उपाय

मासिक पाळीचे ते चार ते पाच दिवस महिलांसाठी फार त्रासदायक असतात. या वेळी त्यांना मानसिक आणि अनेक शारीरीक त्रास होत असतो. आज महिला घर आणि नोकरी अशी दुहेरी भूमिका सांभाळते. मग अशा वेळी हा त्रास तिला अनेक वेळा अडथळा होतो. काही जणी गोळ्यांनी हे त्रास कमी करण्याचा प्रयत्न करतात, पण त्याचे शरीरावर दुष्परिणाम दिसून येतात. त्यामुळे घरगुती उपाय करून आपण हा त्रास कसा कमी करू शकतो ते पाहूयात...



कोमट तेलाने मालिश : या दिवसांमध्ये कंबर, ओटीपोट दुखते. अशा वेळी कोमट तेलाने मालिश केल्यास आराम मिळतो. मालिश केल्याने शरीराचे काही पॉईंट्स दाबले जातात. त्यामुळे शरीराच्या नसा मोकळ्या होतात आणि दुखण्यातून आराम मिळतो.

गरम पाण्याचा शेक : हा तर सगळ्यात उपयुक्त उपाय आहे. गरम पाण्याचा शेक हा एखाद्या पेनकिलर गोळीचे काम करतो. या दिवसात ओटीपोट आणि कंबर प्रचंड दुखत असते. अशा वेळी गरम पाण्याचा शेक घेतला तर खूप फायदेशीर ठरतो.

व्यायाम करणे : अनेक जणी या दिवसात व्यायाम करत नाही. व्यायाम करा म्हणजे अगदी जिमला जा असे नाही. तर शरीराला हालचाल होईल म्हणजे चालणे, घरातली कामे करा, ज्यामुळे शरीराची हालचाल होते. मग नसा मोकळ्या होतात आणि बरे वाटते.

व्हिटॅमिन डीयुक्त आहार घ्या : या दिवसांत व्हिटॅमिन डीची शरीरात कमी होते. म्हणून अशा वेळी आपल्याला कंबर आणि पोट दुखते. त्यामुळे व्हिटॅमिन डीयुक्त आहार या दिवसात घ्यावा.

काही पदार्थ टाळा : या दिवसांमध्ये चहा, कॉफी आणि काही शीतपेय या दिवसात टाळावीत.

या गोष्टी घ्या : हर्बल टी, ग्रीन टी, बडीशोप, दालचिनी, आले, हिरव्या भाज्या, चिकन, मासे, अक्रोड, बदाम, पपई आणि केळी खायला पाहिजे.

गरम पाण्याने आंघोळ : या दिवसात गरम पाण्याने आंघोळ करावी, ज्यामुळे शरीराच्या नसा मोकळ्या होतात. अंग शेकले जाते आणि दुखण्यापासून मुक्तता होते.

भरपूर आणि गरम पाणी प्या : या दिवसांमध्ये भरपूर आणि गरम पाणी प्यायलाने खूप फायदा होता.

असे घरगुती उपाय केल्यास मासिक पाळीचे दिवस जरा सोपे जातील, मात्र काय एक गोष्ट लक्षात ठेवा शरीराशी निगडित गोष्टी असताना कुठलीही गोष्ट करताना तुमच्या डॉक्टरचा सल्ला नक्की घ्या. प्रत्येकाचा त्रास त्याच्या शरीराशी संबंधित असतो. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला कायम महत्त्वपूर्ण असतो.

# व्हॉलीबॉल स्पर्धेत बोर्ली–मांडला संघ विजेता

## महिला गटात अलिबागची बाजी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनच्या मान्यतेने अलिबाग तालुक्यातील हाशिवरे येथे स्व. मधुकर ठाकूर क्रीडा नगरीत घेण्यात आलेल्या रायगड जिल्हा डायरेक्ट व्हॉलीबॉल निवड चाचणी स्पर्धेत पुरुषांच्या गटात सेव्हन स्टार बोर्ली–मांडला (ब) संघाने आणि महिला गटात सेंट मेरीज हायर सेकंडरी कॉन्व्हेंट स्कूल अलिबागने आद्य सप्लायर्स चषक २०२१वर नाव कोरले.

दुसरी जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी डायरेक्ट व्हॉलीबॉल स्पर्धा नुकतीच हाशिवरे शाळेच्या क्रीडांगणावर घेण्यात आली. अमित नाईक मित्र मंडळ सारळ आणि आद्य सप्लायर्स म्हात्रोळी यांच्या वतीने घेण्यात आलेल्या या स्पर्धेला जिल्हाभरातून पुरुषांचे आणि महिलांचे असे एकूण ४६ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन उद्योजक अमित नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेला खारेपाटातील विविध स्तरातील मान्यवर, आजी–माजी सरपंच व खेळाडू उपस्थित होते.

स्पर्धा उत्तरोत्तर रंगत गेली. पुरुष गटात अंतिम सामना सेव्हन स्टार बोर्ली मांडला (ब) आणि मिडल एज पेण या दोन संघात झाला. अटीतटीच्या लढतीत बोर्ली मांडला (ब) संघाने विजेतेपद पटकाविले. मॉडेल रांजणखार संघ तिसऱ्या, तर सेव्हन स्टार बोर्ली मांडला (अ) संघाने चौथा क्रमांक मिळविला. उत्कृष्ट खेळाडू म्हणून पेण संघाच्या तुषार सावंतला आणि उत्कृष्ट नेटमन म्हणून बोर्ली मांडला (ब) संघाच्या अब्दुल रहिमानला सन्मानित करण्यात आले.



महिला गटात सेंट मेरीज हायर सेकंडरी कॉन्व्हेंट स्कूल अलिबाग आणि पनवेल तालुका डायरेक्ट व्हॉलीबॉल असोसिएशन यांच्यात अंतिम सामना झाला. यात अलिबाग संघाने बाजी मारून विजेतेपद पटकाविले. महिलांच्या सामन्यांमध्ये अलिबागची योगिता भोईर उत्कृष्ट खेळाडू ठरली, तर पनवेलची समीक्षा सकपाळ हिला उत्कृष्ट नेटमन म्हणून गौरविण्यात आले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण काँग्रेसचे प्रदेश सचिव अ‍ॅड. प्रवीण ठाकूर आणि आद्य सप्लायर्सचे उद्योजक अमित नाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

# पनवेलमधील घोट येथे आमदार प्रशांत ठाकूर चषक क्रिकेट स्पर्धा

## भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील घोट येथे गावदेवी क्रिकेट क्लबच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन युवा मोर्चा प्रभाग अध्यक्ष नितेश पाटील आणि भाजप तालुका चिटणीस नवनाथशेठ पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.



या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक प्रवीण पाटील, युवा मोर्चा प्रभाग अध्यक्ष नितेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते कमलाकर पाटील, कैलास पाटील, प्रकाश पाटील, हनुमान दारावकर, शिवा गोंधळी, हरिश्चंद्र कोळी, विश्वनाथ पाटील, बाळाराम पाटील, प्रभाकर पाटील, चंद्रकांत पाटील, शैलेश कोळी, तकदीर पाटील, रूपेश निघुकर, संभाजी गोंधळी, लहू पाटील, प्रशांत दारावकर, श्रीकृष्ण निघुकर, सतीश पाटील, कुमार पाटील आदींसह खेळाडू व दर्शक उपस्थित होते.

# अ‍ॅथलिटिक्स स्पर्धेसाठी पूर्वा जाधवची निवड



**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा अ‍ॅथलिटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया असोसिएशनच्या वतीने रायगड जिल्हा क्रॉसकंट्री स्पर्धेचे रसायनी येथील पिल्लेज कॉलेज येथे आयोजन करण्यात आले होते. यात पूर्वा विनोद जाधव हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. त्यामुळे तिची २५ व २६ डिसेंबर रोजी सांगली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

पूर्वा जाधव ही खोपोली येथील केएमसी कॉलेजची विद्यार्थिनी असून डॉ. माने यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे. पूर्वाने याआधी शिशू मंदिर येथे शिकत असताना अमित विचारे यांच्या मार्गदर्शनाखाली पाच वर्षे सराव केला. तिने शालेय गटात विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन क्रमांक पटकावले आहेत, तसेच ती मुंबई विभागातूनसुद्धा तीन वर्षे खेळलेली आहे.





**कळंबोली : सागर बीडगर व नवनाथ लकडे यांनी नव्याने सुरू केलेल्या हॉटेल निसर्गचे उद्घाटन मंगळवारी आमदार गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माण–खटावचे आमदार जयकुमार गोरे, आटपाडीतील गणेश भुते, पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, उपमहापौर जगदिश गायकवाड, महिला व बालकल्याण सभापती मोनिका महानवर, महिला आघाडीच्या विद्या तामखडे, नंदकिशोर शिंदे, अभिजित चोरमले, भावेश सावंत उपस्थित होते.**

## राम प्रहर अर्थसाक्षर प्रश्नमंजुषा

आपल्या दैनिक **राम प्रहर**मध्ये दर रविवारी अर्थ प्रहर सदर प्रकाशित होते. या सदरातून वाचकांना अर्थविषयक माहिती देण्यात येते. ही माहिती 'राम प्रहर'च्या वाचकांसाठी लाभदायक ठरत असते. याच सदरात दर रविवारी आता वाचकांसाठी प्रश्नमंजुषा सुरू करीत आहोत.

'अर्थसाक्षर' या शीर्षकाखाली येत्या रविवारी, दि. २६ डिसेंबर २०२१पासून सुरू होणाऱ्या या प्रश्नमंजुषेमध्ये वाचकांना तीन प्रश्न विचारण्यात येतील. या प्रत्येक प्रश्नासोबत चार पर्यायी उत्तरे दिली जातील. त्यातील योग्य उत्तर वाचकांनी निवडायचे आहे. निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

या तिन्ही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तिन्ही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई–स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील. तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com